नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २९८ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरूवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## राज्यात 1 नोव्हेंबर ते 05 डिसेंबर दरम्यान आरोग्य मंत्र्यांची राज्यव्यापी "आरोग्य संवाद यात्रा"

### राज्यातील सुमारे 10 लाख आरोग्य समिती सदस्य, लोकप्रतिनिधी व सर्वसामान्य नागरिकांशी आरोग्यमंत्री साधणार संवाद

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील आरोग्य सेवेत लोकसहभाग वाढवने, सेवेची गुणवत्ता, पारदर्शकता, व विविध योजनांची अधिक परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी, थेट जनतेला भेटुन अभिप्राय व सुचना जाणून घेण्यासाठी राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिनांक 01 नोव्हेंबर पासून 05 डिसेंबर पर्यंत राज्यभर "आरोग्य संवाद यात्रा" आयोजित केली आहे.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ही सामान्य माणसाला मोठा आधार आहे. ती अधिक सक्षम, गुणवत्ता पूर्ण व लोकाभिमुख करण्याचा शासनाचा निर्धार असुन, आरोग्यसेवेत लोक सहभाग वाढवण्यासाठी आरोग्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने प्रथमच "आरोग्य संवाद यात्रा" आयोजित करण्यात आली आहे. या माध्यमातून आरोग्यमंत्री जनतेशी थेट संवाद साधून आरोग्य व्यवस्थेबद्दल जनमताचा कानोसा घेवुन स्थानिक लोकप्रतिनिधी व आरोग्य समिति सहभागाने आरोग्यसुविधा मजबूत करण्यात येणार आहे.

या "आरोग्य संवाद" यात्रेत सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव, आयुक्त, संचालक, सहसंचालक, उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, व सर्व आरोग्य योजनांचे प्रमुख अधिकारी सहभागी होणार आहेत. या आरोग्य संवाद यात्रे दरम्यान ग्रामपंचायत स्तरावरील उपकेंद्रा पासून ते ग्रामीण रुग्णालय , उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालये, पालिका रुग्णालये, स्त्री रुग्णालये, मनोरुग्णाये व विशेष रुग्णालया पर्यंतच्या सर्व आरोग्य संस्थांच्या कामकाजाची वस्तुस्थिती जाणून घेण्यात येणार आहे. यात्रेदरम्यान राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जिल्हा, तालुका, महापालिका, व गाव पातळीवरील सुमारे 10 लाख आरोग्य समिती सदस्य व सर्वसामान्य नागरिकांशी आरोग्यमंत्री संवाद साधणार आहेत. आरोग्य समितीने सादर केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने 5 डिसेंबर नंतर राज्यस्तरावर बैठक संपन्न होणार आहे. या यात्रेत प्रत्येक जिल्ह्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे व दोन ग्रामीण रुग्णालयाला आरोग्यमंत्री अचानक भेट देऊन कामकाजाचा आढावा घेऊन संवाद देखील साधणार आहेत.

आरोग्य संवाद यात्रेच्या माध्यमातून स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत,



जिल्हा स्तरापासून, गाव पातळीवरील उपकेंद्र स्तरापर्यंतच्या सर्व आरोग्य समिती सदस्यांच्या बैठका आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच आरोग्यमंत्री खाजगी वैद्यकीय व्यवसायिकाशी सुध्दा संवाद साधणार आहेत. या सर्व बैठकांमधील अभिप्राय व सूचना घेतल्या जाणार असुन, यात्रेची सांगता झाल्यावर, माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मुंबईत राज्यस्तरीय आरोग्य समिती सदस्यांची बैठक आयोजित करण्यात येणार आहे

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने व्यक्तीच्या जन्माअगोदर प्रसूतिपूर्व सुविधा पासून ते मृत्यू पश्चात शवविच्छेदना पर्यन्त नागरिकाना आरोग्यसेवा दिल्या जातात. राज्यात एकत्रित महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, मोफत महाडायलेसिस, एमआरआय, सिटि स्कॅन, स्टेमी, पॅलेटिव्ह केअर, टेलिमेडीसीन, मोफत रक्त चाचण्या, आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा (102,108), पीएम-राहत, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, माहेरघर, मानसिक आरोग्य समुपदेशन या सारख्या अनेक लोकहिताच्या योजनाची जनतेला माहिती व्हावी. जेणेकरून जास्तीत जास्त गरजू रुग्णांना त्याचा लाभ घेता यावा यासाठी संवाद यात्रेदरम्यान सर्व आरोग्य योजनांचा प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार असुन आरोग्य योजनांचे प्रमुख अधिकारी संवाद यात्रेत सहभागी होणार आहेत.

निरोगी, सशक्त व आरोग्य संपन्न महाराष्ट्र घडवण्याच्या ध्येयाने माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे मार्गदर्शनाखाली "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" अभियान सुरु केले असुन, Precaution is Better than cure या उक्ती नुसार आजार होवू नये यासाठी रोगराई प्रतिबंधात्मक उपाययोजना, सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण, आरोग्यदायी जीवनशैली याबाबतचे प्रबोधन, व आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहित आरोग्य संवाद यात्रेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिका पर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देऊन, आरोग्यसंपन्न महाराष्ट्र घडवण्याच्या दृष्टीने ही यात्रा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## नूतन हिंदी विद्यालयात विद्यार्थ्यांनी दिला 'नो ड्रग्स'चा नारा

ठाणे : (स. गांवकरी)

सेवा संकल्प अभियान तसेच नशामुक्त भारत अभियानांतर्गत जिल्हा परिषद, ठाणे समाजकल्याण विभाग आणि नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण येथील कोळसेवाडी परिसरातील नूतन हिंदी विद्यालयात येथे दि. १३ ऑक्टोबर, २०२६ रोजी अंमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषद, ठाणे समाजकल्याण अधिकारी उज्ज्वला सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात १७५ विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त भारत घडविण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमात नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्याचे ठाणे जिल्हा संघटक मिलिंद रूपचंद पाटील यांनी 'अंमली पदार्थांना नाही म्हणा आणि जीवनाला हो म्हणा' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. युवकांमध्ये व्यसनांविषयी जागरूकता निर्माण करणे, अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांची माहिती देणे आणि व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

मार्गदर्शन करताना मिलिंद पाटील यांनी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनांचा व्यक्तीच्या आरोग्यावर तसेच समाजावर होणाऱ्या दुष्परिणामांविषयी माहिती दिली. तंबाखूच्या सेवनामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. तसेच युवकांमध्ये व्यसनाधीनता निर्माण झाल्यास त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासोबतच शिक्षणावर आणि भविष्यातील प्रगतीवरही प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थांपासून दूर राहून निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा, व्यसनांच्या प्रलोभनांना बळी पडू नये आणि आपल्या मित्रपरिवारातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच परिसरात अंमली पदार्थांची विक्री किंवा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी सतर्क राहून संबंधित यंत्रणांना सहकार्य करावे, असे सांगत या राष्ट्रीय कार्यात प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहन केले.

नूतन हिंदी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. अनुप्रिता पटवर्धन यांनी आपल्या मार्गदर्शनातून अंमली पदार्थविरोधी जनजागृतीची आवश्यकता अधोरेखित केली. व्यसनांविरोधात सकारात्मक वातावरण निर्माण करणे, युवकांना योग्य दिशा देणे आणि व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व पटवून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

'व्यसन सोडा, माणसे जोडा' आणि 'जीवन खूप सुंदर आहे' या संदेशातून त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आणि स्वतःसह समाजाच्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले.

## थोडक्यात...

### सर्व शाळांमध्ये स्काऊट-गाईड बंधनकारक – भुसे

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील सर्व माध्यमांच्या १ लाख ८ हजार शाळांमधील सुमारे २ कोटी १० लाख विद्यार्थ्यांना स्काऊट-गाईडचे प्रशिक्षण बंधनकारक करण्याचे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. शालेय शिक्षण मंत्री भुसे यांनी सर्व शाळांमध्ये स्काऊट-गाईडचा विस्तार करण्याबाबत बैठक घेतली. राज्यातील ३० हजार शाळांमधील सुमारे १७ लाख ३३ हजार विद्यार्थ्यांना सध्या स्काऊट-गाईडचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाची व्याप्ती राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांपर्यंत वाढविण्याचे निर्देश त्यांनी दिले. 'राष्ट्र प्रथम' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून शालेय शिक्षण विभाग काम करीत आहे. त्यामुळे सर्व शाळांमध्ये स्काऊट-गाईड असणे आवश्यक आहे. या उपक्रमांतर्गत परेड, संचलन आणि देशभक्तिपर गीतांवरील कवायत बंधनकारक करावी. तसेच 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत आठवड्यातून दोन तासिका यासाठी घेण्यात याव्यात, असे निर्देश मंत्री भुसे यांनी दिले.

### समान भाषा उपशीर्षकांमुळे भाषा शिक्षणाला गती

मुंबई (स. गांवकरी) : दृकश्राव्य माध्यमांमध्ये समान भाषेतील उपशीर्षके (subtitles) उपलब्ध झाल्यामुळे भाषेचे आकलन आणि वाचन वाढण्यास मदत होईल. या उपक्रमामुळे निश्चितच भाषा शिक्षणाला गती येईल, असा विश्वास माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव व महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला. वरळी येथील दूरदर्शन केंद्रात प्लॅनेट रीड 'मराठी समान भाषा उपशीर्षक केंद्रा'चा शुभारंभ सिंह यांच्या हस्ते फित कापून करण्यात आला. त्यानंतर दूरदर्शन केंद्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी दूरदर्शन केंद्र मुंबईचे उपसंचालक (अभियांत्रिकी) हेमंत देसाई, गणेश अय्यर आणि आयआयटी दिल्लीचे सहाय्यक प्राध्यापक तथा 'बिलियन रीडर्स'चे प्रमुख प्रा. ब्रिज कोठारी उपस्थित होते.

## राज्यातील ३०४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित – मंत्री मकरंद जाधव पाटील

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील ट्रिगर-१ आणि ट्रिगर-२ लागू झालेल्या एकूण ३०४ तालुक्यांना अंतिमतः दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहे. या तालुक्यांमध्ये दुष्काळी उपाययोजना आणि विविध सवलती लागू करण्यात येणार असून, पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती मदत व पुर्नवसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. खरीप हंगाम २०२६ मधील पर्जन्यमानातील तूट आणि अन्य संबंधित घटकांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ट्रिगर-१ लागू झालेल्या २६५ तालुक्यांना 26 सप्टेंबर 2026 रोजी दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले होते. आता ट्रिगर-१ आणि ट्रिगर-२ च्या आधारे आणखी 39 तालुक्यांचा नव्याने समावेश केल्याने एकूण 304 तालुके अंतिमतः दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत.

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये शेतकरी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने १२ विविध उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेतला होता. या योजनांनाचा लाभ नव्याने समावेश करण्यात आलेल्या 39 तालुक्यांना देखील लागू होणार आहे.

तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे अधिकाधिक सुरू करण्यासाठी निकषांमध्ये शिथिलता आणणे, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, टंचाई जाहीर केलेल्या गावांतील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीजजोडणी खंडित न करणे, शेतकरी व शेतमजुरांसाठी अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे आणि पिण्याचे पाणी व जनावरांच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे, अशा उपाययोजना करण्यात येणार आहेत.

## माहूरमध्ये 23 तंबाखू विक्रेत्यांवर कारवाई; 9 हजार 600 रुपयांचा दंड वसूल

नांदेड : (स. गांवकरी)

माहूर शहर व परिसरात तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याच्या तसेच सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने अधिनियम, 2003 (कोटपा) कायद्याचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने मंगळवार, दि. 13 ऑक्टोबर 2026 रोजी धडक मोहीम राबविली. या मोहिमेत विविध ठिकाणी अचानक तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या 23 तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एकूण 9 हजार 600 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनुपमा शिंदे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे आणि नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. संजीवनी जाधव, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, समुपदेशक किरण चिरडे आणि एमजीव्हीएसचे मंगेश गायकवाड यांचा समावेश होता.

या मोहिमेसाठी माहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल सत्यपाल मडावी आणि होमगार्ड शेख असलम यांनी सहकार्य केले. तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर नियंत्रण ठेवणे, कायद्याच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे, हा या मोहिमेचा उद्देश आहे. सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालयांच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, सेवन किंवा साठवण होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी जिल्हा रुग्णालय, नांदेड येथील जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाकडे तक्रार नोंदवावी. तंबाखू नियंत्रण कायद्याचे पालन करून नांदेड जिल्हा तंबाखूमुक्त करण्याच्या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.

## महानगरपालिकेच्या दवाखान्यात थाटला चक्क माव्याचा धंदा

### महापालिका आयुक्तांच्या पाहणीत झाला पर्दाफाश

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर महापालिकेच्या आरोग्य केंद्राच्या जागेत एकाने अतिक्रमण केले, खोली बांधली आणि तेथे सुरू केला मावा विक्रीचा अवैध व्यवसाय. महापालिका आयुक्तांच्या पाहणीत पर्दाफाश करण्यात आला असून, पोलिसांत या बाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोग्य केंद्रात मावा बनविण्याच्या अड्डयावर आयुक्त डॉ. ओंबासें यांनी 'मुंडे स्टाईल' धाड टाकून कारवाई केली यामुळे सोलापुरात मोठी खळबळ उडाली आहे. सोलापूर मनपा आयुक्त हे आरोग्य केंद्राच्या पाहणीसाठी गेले असता तेथे मावा तयार करण्याचा कारखाना आढळून आला ;

आरोग्य केंद्राची पाहणी करण्यासाठी गेलेल्या महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी चक्क आरोग्य केंद्राच्या परिसरात सुरू असलेला मावा बनविण्याचा कारखाना शोधून काढला ! अनधिकृत कारखाना नजरेस पडताच आयुक्तांनी थेट पोलीस उपायुक्तांना फोन करून कारवाईचे आदेश दिले. तुकाराम मुंडे यांच्या धडाकेबाज कार्यशैलीची





आठवण करून देणाऱ्या या कारवाईमुळे अनधिकृतांचे धाबे दणाणले आहेत.

प्रभाग क्रमांक ०८ मधील नगरसेवकांच्या विनंतीवरून महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी साखर पेठ येथील कै. यशोदाबाई सिद्रामप्पा दिड्डी आरोग्य केंद्राला भेट देऊन संपूर्ण इमारतीची पाहणी केली. यावेळी आरोग्य केंद्रातील आवश्यक दुरुस्ती, वैद्यकीय सुविधा आणि अपुऱ्या मनुष्यबळाबाबत आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

सदर आरोग्य केंद्राची इमारत अत्यंत जुनी व जीर्ण झाली असून, यापूर्वी रुग्णांची तपासणी सुरू असतानाच स्लॅबचे काँक्रीट ढासळल्याची गंभीर घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी इमारतीची बारकाईने पाहणी केली.

मागील बाजूस पाहणी अन् आयुक्तांसमोर धक्कादायक प्रकार!

आरोग्य केंद्राच्या पाठीमागील मोकळ्या जागेची पाहणी करण्यासाठी आयुक्त गेले असता तेथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले. एका ठिकाणी नवीन सायकल फिटिंगचा कारखाना सुरू असल्याचे दिसले. त्याच परिसरात जाळीच्या गेटमधून पाहणी केली असता चक्क मावा बनविण्याचा कारखाना सुरू असल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले!

हा प्रकार पाहताच आयुक्त डॉ. ओंबासे यांनी क्षणाचाही विलंब न करता पोलीस उपायुक्त प्रीतम यालावलकर यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून संबंधित प्रकाराची माहिती दिली आणि तातडीने कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना केल्या. आयुक्तांच्या सूचनेनंतर पोलीस यंत्रणा तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. संबंधित ठिकाणाची पाहणी करून गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

दरम्यान, महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे अविनाश वाघमारे यांच्या पथकानेही घटनास्थळी पाहणी करून अतिक्रमणधारकांवर कारवाई तसेच साहित्य जप्त करण्याची प्रक्रिया सुरू केली.

नागरिकांना आरोग्यसेवा देण्यासाठी असलेल्या महापालिकेच्या आरोग्य केंद्राच्या परिसरातच मावा बनविण्याचा कारखाना सुरू असल्याचा प्रकार समोर आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. एकीकडे जीर्ण इमारतीतून नागरिकांना आरोग्यसेवा दिली जात असताना दुसरीकडे आरोग्य केंद्राच्या जागेवर अनधिकृत असे उद्योग सुरू असल्याचे पाहणीत उघड झाले. आरोग्य केंद्राच्या विकासासाठी गेले अन् अनधिकृत बंदी असलेल्या मावा कारखान्यावर कारवाईचा बडगा उगारला! आयुक्त डॉ. ओंबासेंच्या या अनपेक्षित धडक कारवाईची शहरात चर्चा रंगली आहे.

आरोग्य केंद्राच्या पाहणीसाठी आलेले आयुक्त थेट कारवाईच्या भूमिकेत शिरल्याने 'मुंडे स्टाईल' प्रशासनाचा प्रत्यय सोलापूरकरांना आला. आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या या धडाकेबाज भूमिकेमुळे अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या पाहणी दौऱ्यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, नगरसेवक अमर पुदाले, नगरसेवक प्रविण दर्गोपाटील, माजी नगरसेवक पांडुरंग दिड्डी, अधिकारी राघवेंद्र गायधनकर, कनिष्ठ अभियंता सलमान मणियार, जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार तसेच महापालिका प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय

# ज्ञानेश कुमारांचे असणे-नसणे!

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी रजेवर जाण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्यच म्हणावा लागेल. त्यामुळे गेल्या बारा दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाची कोंडी फुटण्याचा मार्ग मोकळा झाला. आंदोलकांची भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी होती; मात्र सरकारने राजीनामा स्वीकारला जाणार नसल्याचे स्पष्ट केले होते. आंदोलकांच्या इतरही काही मागण्या होत्या. त्यांपैकी काही सरकारने मान्य केल्या, तर काही मागण्यांबाबत आंदोलकांनी माघार घेतली. भीमनवार यांचा राजीनामा न घेता त्यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर पाठवणे हा सरकार आणि आंदोलक यांच्यातील मध्यममार्ग ठरला. दोन्ही बाजूंनी एक पाऊल मागे घेण्याची तयारी दाखवली आणि त्यातून तिढा सुटला. संघर्षपेक्षा समन्वयाला प्राधान्य देण्याची ही भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या आंदोलनाची व्याप्ती देशभर वाढण्याची चिन्हे दिसत असताना महाराष्ट्रातील आंदोलनाची डोकेदुखी वाढू न देणे, हीदेखील सत्ताधाऱ्यांची भूमिका असू शकते. कारण काहीही असो, या प्रकरणातून तडजोडीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

महाराष्ट्रातील प्रश्नावर मध्यममार्ग निघाला असला, तरी केंद्र सरकारसमोरील आव्हान अधिक गुंतागुंतीचे आहे. 'सीजेपी'च्या आंदोलनानंतर काँग्रेस, डावे आणि इतर विरोधी पक्ष मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी अधिक आक्रमकपणे लावून धरतील, अशी चिन्हे आहेत. विरोधात असताना भाजपनेही अशाच प्रकारच्या मागण्या आणि आंदोलनांचा आधार घेतला होता. त्यामुळे आता विरोधक राजकारण करीत आहेत, अशी टीका करून सत्ताधाऱ्यांना आपली जबाबदारी झटकता येणार नाही. लोकशाहीत विरोधकांना प्रश्न विचारण्याचा आणि सरकारला धारेवर धरण्याचा अधिकार असतो. अशा वेळी संघर्ष वाढवण्याऐवजी तडजोडीचा मार्ग शोधणे हेच राजकीय परिपक्वतेचे लक्षण ठरेल.

भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने यापूर्वीही काही महत्त्वाच्या निर्णयांवरून माघार घेतली आहे. जमीन हस्तांतरणाशी संबंधित तरतुदी असोत किंवा कृषी कायदे असोत, विरोध वाढल्यानंतर सरकारने आपली भूमिका बदलल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे तडजोड करणे सरकारला अशक्य आहे, असे नाही. मात्र, यावेळचे प्रकरण 'नीट' परीक्षेच्या वादापेक्षा अधिक गंभीर आणि संवेदनशील आहे. त्या वेळी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर जबाबदारी निश्चित करून सरकारला राजकीय नुकसान काही प्रमाणात कमी करता आले. परंतु मुख्य निवडणूक आयुक्तांच्या बाबतीत अशी सोपी राजकीय खेळी करणे शक्य नाही.

याचे प्रमुख कारण म्हणजे दोन्ही पदांचे स्वरूप वेगवेगळे आहे. शिक्षणमंत्रिपद हे मंत्रिमंडळातील राजकीय पद आहे. संबंधित मंत्र्याला पदावरून दूर करण्याचा निर्णय पंतप्रधान घेऊ शकतात. मात्र, मुख्य निवडणूक आयुक्तांचे पद घटनात्मक असून त्याला स्वतंत्र स्थान आहे. नियुक्ती सरकारकडून होत असली, तरी नियुक्तीनंतर आयुक्त हे सरकारच्या थेट नियंत्रणाखाली काम करणारे पदाधिकारी नसतात. त्यामुळे पंतप्रधान किंवा मंत्रिमंडळाला त्यांना एखाद्या मंत्र्याप्रमाणे सहजपणे पदावरून हटवता येत नाही. परिणामी, ज्ञानेश कुमार यांच्याबाबत निर्णय घेणे केंद्र सरकारसाठी राजकीयदृष्ट्या अधिक अवघड ठरते.

मात्र, त्यांना पदावर कायम ठेवणेही सरकारसाठी सोपे राहिलेले नाही. ज्ञानेश कुमार जितका अधिक काळ या पदावर राहतील, तितका त्यांच्या विरोधातील असंतोष वाढण्याची शक्यता आहे. आंदोलनाचा विस्तार झाला आणि विरोधकांनी हा मुद्दा देशभर नेला, तर सरकारसमोरील अडचणी अधिक वाढतील. आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला, तर न्यायालयीन हस्तक्षेपाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने आंदोलनाच्या संदर्भात घेतलेल्या भूमिकेमुळे सरकारने न्यायालयीन प्रतिष्ठेचा विचार करूनच पुढील पावले उचलणे आवश्यक आहे. न्यायालयाकडे दुर्लक्ष करणे सरकारला परवडणारे नाही आणि आंदोलकांना पूर्ण मोकळीक दिल्यास राजकीय दबाव वाढण्याची शक्यता आहे. विरोधकांनी नेमकी हीच कोंडी ओळखली आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरत सरकारला बचावात्मक पवित्रा घेण्यास भाग पाडणे, ही त्यांची रणनीती असू शकते. सरकारने काहीच केले नाही, तर विरोधक सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतील. ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर केले, तर सरकारने दबावापुढे माघार घेतल्याचा आरोप होईल. त्यामुळे कोणताही निर्णय घेतला, तरी त्याचे राजकीय परिणाम सरकारला भोगावे लागू शकतात. या प्रकरणाला उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांची पार्श्वभूमीही आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२६ परीक्षेचे शुल्क माफ

नांदेड (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांतील रहिवासी विद्यार्थ्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ परीक्षेसाठी परीक्षा शुल्कातून पूर्णतः सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना . चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि १४ ऑक्टोबर रोजी राज्यातील कुलगुरूंसमवेत झालेल्या ऑनलाइन बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार विद्यापीठाच्या सर्व पदवी, पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नियमित व बॅकलॉग विद्यार्थ्यांसह सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना ही सवलत लागू राहणार आहे. शासनाने घोषित केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांतील रहिवासी विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२६ परीक्षेचे अर्ज कोणतेही परीक्षा शुल्क न घेता स्वीकारण्यात येणार आहेत. पात्र विद्यार्थ्यांपैकी एकही विद्यार्थी या शुल्कमाफीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. संबंधित विद्यार्थ्यांनी आपले परीक्षा अर्ज महाविद्यालयामार्फत ऑनलाइन भरून, आवश्यक प्रक्रियेनुसार १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सादर करावेत, असे विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक हुशारसिंग साबळे यांनी कळविले आहे.

## भोकरच्या तुषार शिंदेची राष्ट्रीय रग्बी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड!

भोकर (स. गांवकरी) : भोकर येथील टार्गेट स्पोर्ट्स अकॅडमीचा खेळाडू आणि श्री शाहू महाराज विद्यालयाचा विद्यार्थी तुषार हरी शिंदे याची शालेय राष्ट्रीय रग्बी क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. डेरवण, चिपळूण (जि. रत्नागिरी) येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय रग्बी निवड चाचणीत त्याने मिळवलेल्या यशामुळे भोकरसह नांदेड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंद व्यक्त होत आहे. तुषारने मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर हे यश मिळवले. टार्गेट स्पोर्ट्स अकॅडमीतील प्रशिक्षण आणि स्पर्धेतील कामगिरीच्या बळावर त्याला राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. त्याच्या निवडीमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंनाही राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची प्रेरणा मिळणार आहे. या यशाबद्दल नांदेड रग्बी असोसिएशनचे सचिव प्रल्हाद कुलकर्णी व असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह टार्गेट स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष व्यंकट माने, श्री शाहू महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक किनवाड, क्रीडा शिक्षक शेख सलीम, महिला क्रीडा प्रशिक्षिका कु. सलोनी व्ही. सुरदसे, क्रीडा मार्गदर्शक तथा प्रशिक्षक शिवदास खुपसे आणि मुख्य क्रीडा प्रशिक्षक बालाजी गाडेकर यांनी तुषारचे अभिनंदन केले. तसेच आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या.




## साई दुर्गा मंडळाच्या वतीने कै.कत्तुरवार यांच्या स्मरणार्थ नेत्रतपासणी शिबिर

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव येथील स्वामी रामानंद तीर्थ चौक, जुना मोंढा परिसरातील साई दुर्गा नवरात्र महोत्सवाच्या वतीने कै. राजेश्वर लच्छमन्ना कत्तुरवार यांच्या स्मरणार्थ नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल १९० नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. शिबिराचा शुभारंभ प्रमुख पाहुणे माने नेत्रालयाचे सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. शैलेश बच्चुवार यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते मारोती कतुरवार यांच्या पुढाकारातून ठेवलेल्या शिबिरात ओमप्रकाश नारलावार, मारोती कत्तुरवार, संदीप देमेवार आणि प्रदीप देमेवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. नेत्रतपासणीच्या माध्यमातून नागरिकांना डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूक करणे आणि आवश्यक तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या प्रसंगी साई दुर्गा नवरात्र महोत्सवाचे अध्यक्ष विनायक शंकरराव चव्हाण यांच्यासह बालाजी तळणीकर, संदीप देमेवार, मारोती कत्तुरवार, माधव चव्हाण, प्रदीप देमेवार, साईनाथ चौधरी आणि बाळू सोनकांबळे यांच्या वतीने डॉ. शैलेश बच्चुवार यांचा शाल व साईबाबांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी परिसरातील माता-भगिनी, नागरिक आणि महोत्सवाचे पदाधिकारी उपस्थित होते. कै. राजेश्वर लच्छमन्ना कत्तुरवार यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून आरोग्यसेवेचा सामाजिक संदेश देण्यात आला.





## शिवसेना ठाकरे गटाचे आंबेगाव तालुकाप्रमुख भालेराव यांचा राजीनामा

आंबेगाव : (स. गांवकरी)

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आंबेगाव तालुकाप्रमुख नितीन भालेराव यांनी आपल्या तालुकाप्रमुख पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी स्वेच्छेने राजीनामा देत असल्याचे जाहीर केले असून, व्यवसायामुळे पक्षाच्या कामासाठी पुरेसा वेळ देता येत नसल्याचे कारण दिले आहे. मात्र, त्यांच्या राजीनाम्यानंतर आंबेगाव तालुक्यात राजकीय चर्चांना उधाण आले असून, पक्षातील अंतर्गत गटबाजीमुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

नितीन भालेराव हे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात आंबेगाव तालुकाप्रमुख म्हणून काम पाहत होते. तालुक्यात पक्ष संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांशी समन्वय साधणे तसेच पक्षाची भूमिका सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे, अशा विविध जबाबदाऱ्या तालुकाप्रमुख म्हणून पार पाडाव्या लागतात. मात्र, व्यावसायिक जबाबदाऱ्यांमुळे पक्षाच्या कामासाठी अपेक्षित वेळ देता येत नसल्याने आपण तालुकाप्रमुख पदाचा राजीनामा देत असल्याचे भालेराव यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, गेल्या काही काळापासून आंबेगाव तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षांतर्गत काही घडामोडी सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. पक्षातील अंतर्गत मतभेद आणि गटबाजीमुळेच नितीन भालेराव यांनी तालुकाप्रमुख पद सोडण्याचा निर्णय घेतला का, याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. तथापि, भालेराव यांनी राजीनामा देण्यामागे व्यवसायामुळे पक्षाला वेळ देता येत नसल्याचे कारण दिले असून, अंतर्गत गटबाजी हेच राजीनाम्याचे कारण असल्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

## नैसर्गिक आपत्तीमुळे घरांचे नुकसान झालेल्या कुटुंबांना ₹३.७० लाखांची आर्थिक मदत

### आहवा तालुक्यातील चार लाभार्थ्यांना एकूण ₹३,७०,५०० च्या मदतीचे धनादेश वितरित

डांग : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यात पावसाळ्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे घरांचे नुकसान झालेल्या कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. आहवा तालुका पंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमात चार बाधित लाभार्थ्यांना एकूण ₹३,७०,५०० (तीन लाख सत्तर हजार पाचशे रुपये) आर्थिक मदतीचे धनादेश वितरित करण्यात आले.



आहवा तालुका पंचायत कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला तालुका पंचायत अध्यक्षा वीणाबेन गांगुर्डे, आहवा-१ चे तालुका पंचायत सदस्य राकेश पवार आणि तालुका विकास अधिकारी आर. बी. चौधरी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या लाभार्थ्यांना मदतीचे धनादेश प्रदान करण्यात आले. दरम्यान, आहवा तालुक्यातील विविध गावांमध्ये मुसळधार पाऊस आणि नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक घरांचे अंशतः तसेच पूर्णतः नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियमानुसार नुकसानीचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना आर्थिक मदत देण्याची कार्यवाही तालुका पंचायतीमार्फत करण्यात आली.

यावेळी तालुका पंचायत सदस्य राकेश पवार म्हणाले की, नैसर्गिक आपत्तीच्या काळात ग्रामस्थांना आर्थिक आधार देणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. पावसाळ्यात घरांचे नुकसान झालेल्या कुटुंबांना वेळेत आर्थिक मदत मिळाल्यामुळे घरांची दुरुस्ती आणि पुन्हा उभे राहण्यासाठी या निधीचा उपयोग होईल.

आर्थिक मदत मिळालेल्या लाभार्थ्यांनी कठीण परिस्थितीत तातडीने कार्यवाही करून मदत उपलब्ध करून दिल्याबद्दल आहवा तालुका पंचायत आणि स्थानिक प्रशासनाचे आभार मानले.

## 'बच्चों की उड़ान' टॅलेंट हंट शोमध्ये बालप्रतिभांचा गौरव; नानजीभाई ठक्कर यांचा सन्मान!

ठाणे : (स. गांवकरी)

सिकंदर आझम फाऊंडेशन आणि राब्ता फाऊंडेशन यांच्या वतीने माटुंगा येथील म्हैसूर सभागृहात आयोजित 'बाल प्रतिभा पुरस्कार – २०२६' अर्थात 'बच्चों की उड़ान' टॅलेंट हंट शो उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात विविध कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या बालकलाकारांना पुरस्कार प्रदान करून त्यांच्या प्रतिभेचा गौरव करण्यात आला. बालकांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा आणि त्यांना कला क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या सोहळ्याला शेठ एन. के. टी. ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्टचे नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, गायत्री लचके, राजेंद्र पांडे, माहिम दर्ग्याचे ट्रस्टी सोहेल खांडवानी, अब्दुल रहीम खत्री, मंजू लोढा, अभिनेते व दिग्दर्शक नासिर खान, इक्बाल मेमन, अ‍ॅड. युसूफ अब्राहानी, दिलशाद खान, किसन बाजीराव पावडे, मॉडेल रूपिका ग्रोव्हर आणि चित्रपट निर्माते दैवता पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नानजीभाई ठक्कर यांना सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. बालकलाकारांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमानिमित्त धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वतीने उपस्थितांना साड्या, पेन, स्वयंपाकघरातील साहित्य, मिठाई, वह्या, गीतासार आणि नाश्त्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत बालप्रतिभेला प्रोत्साहन देणे, गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे आणि समाजात सहकार्याची भावना वाढविणे, हा या उपक्रमाचा संदेश होता.

बालकांसह पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला प्रतिसाद दिला. या उपक्रमामुळे बालकलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळाले असून, आयोजकांच्या प्रयत्नांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

## स्वारातीम विद्यापीठात आज 'जागर आरोग्याचा – मुख्यमंत्री आरोग्य संवाद'; नामवंत वैद्यकीय तज्ज्ञांचे लाभणार मार्गदर्शन

नांदेड : (स. गांवकरी)

निरोगी जीवनशैली, मानसिक स्वास्थ्य आणि संतुलित आहाराविषयी जनजागृती करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि इंडियन मेडिकल असोसिएशन, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि.१५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात 'जागर आरोग्याचा – मुख्यमंत्री आरोग्य संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार असून, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे मुख्य समन्वयक रामेश्वर नाईक यांची प्रमुख उपस्थिती असेल. प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे विशेष अतिथी, तर महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेचे अध्यक्ष डॉ. संजय कदम आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेडचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. उमेश आत्राम, आहारतज्ज्ञ डॉ. उषा जाधव आणि मानसोपचारतज्ज्ञ डॉ. मनस्वी कोटकर हे मानसिक आरोग्य, आहारविषयक सजगता आणि निरोगी जीवनशैली यांवर मार्गदर्शन करणार आहेत.

आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यासह नागरिकांमध्ये आरोग्यसाक्षरता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि इंडियन मेडिकल असोसिएशन, नांदेडचे अध्यक्ष डॉ. प्रल्हाद कोटकर यांनी केले आहे.

## नवरात्रोत्सवात दृष्टिहीन महिला उद्योजिकांचे औक्षण; विक्री साहित्य देत स्वावलंबनाला प्रोत्साहन

पुणे : (स. गांवकरी)

नवरात्रोत्सवात स्त्रीशक्तीचा जागर होत असताना, केवळ मदतीचा हात देण्यापेक्षा स्वावलंबनासाठी संधी उपलब्ध करून देण्याचा प्रेरणादायी उपक्रम जय गणेश व्यासपीठ, पुणे शहर यांच्या माध्यमातून राबविण्यात आला.

पुणे रेल्वे स्थानकासह विविध ठिकाणी चिक्की, अगरबत्ती, धूप-वाती, खेळणी आणि कटलरी यांसारख्या वस्तूंची विक्री करून स्वतःचा उदरनिर्वाह करणाऱ्या नऊ दृष्टिहीन महिला उद्योजिकांना विक्रीसाठी आवश्यक साहित्य देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सहकार्याचे तोरण बांधत, त्यांच्या कष्टांचा आणि जिद्दीचा गौरव करणारा हा उपक्रम नवरात्रोत्सवातील स्त्रीशक्तीच्या पूजनाचा एक अनोखा आविष्कार ठरला.

बुधवार पेठेतील साईनाथ मंडळ ट्रस्ट, अरण्येश्वर येथील एकता मित्र मंडळ आणि भवानी पेठेतील श्री शिवाजी मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी सर्व महिला उद्योजिकांना औक्षण करून त्यांचे अनोख्या पद्धतीने पूजन करण्यात आले आणि त्यांच्या व्यवसायाला हातभार लावण्यासाठी विक्री साहित्य वितरित करण्यात आले.




सणांचे खरे मांगल्य केवळ पूजेत नसते, तर समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याची संधी देण्यात असते. मदतीपेक्षा स्वावलंबनाला बळ देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आणि माणुसकीचा जागर घडवणारा आहे असे मनोगत खटावकर यांनी केले

शिल्पकार विवेक खटावकर, सौ. वैशाली खटावकर, सिद्धेश्वर मंदिराचे विश्वस्त बाळासाहेब पाटोळे आणि कुमार आणवेकर यांच्या हस्ते साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमासाठी अद्वैत परिवाराच्या 'मदत नको, संधी द्या' या संकल्पनेतून संतोष डिंबळे, सोमनाथ कांबळे, कृष्णा घुले तसेच नगरसेविका शैलजाताई भोसले यांचे विशेष सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे आयोजन पीयूष शाह, प्रल्हाद भाऊ थोरात आणि सुधीर ढमाले यांनी केले. यावेळी नरेंद्र व्यास, ऋत्विक आदमूलवार, गंधाली शाह आणि हेरंब ढमाले उपस्थित होते. पीयूष शाह यांनी प्रास्ताविक केले, तर सुधीर ढमाले यांनी आभार मानले.

# थोडक्यात पण महत्वाचे




## दिव्यात सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाच्यावतीने आरोग्य शिबीर संपन्न

**ठाणे (स. गांवकरी) :** दिव्यातील दातीवली-दळवी नगर येथील श्री मोतीराम मामा दळवी आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सव मोठ्या भक्तिमय आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात येत आहे. 'नवसाला पावणारी म्हैशासुर मर्दिनी' म्हणून श्रद्धास्थान असलेल्या देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असून, मंडळाच्या वतीने सर्व देवीभक्तांचे उत्साहात स्वागत करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून डॉ. पराग जोशी यांच्या हरे कृष्णा मानव कल्याण मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा परिसरातील नागरिक आणि देवीभक्तांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा मंडळाचा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. देवीच्या दर्शनासह विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमुळे दळवी नगर परिसरात नवरात्रोत्सवाचा उत्साह पाहायला मिळत आहे.

## अपघातात जखमी झालेला साळींदर सुखरूप; वन विभागाकडून उपचार सुरू

**अर्धापूर (स. गांवकरी) :** तालुक्यातील दाभड परिसरातील राष्ट्रीय महामार्गावर एका अज्ञात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झालेले एक साळींदर प्राणी आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिकांच्या सतर्कतेमुळे आणि वन विभागाच्या तत्परतेमुळे जखमी मुक्या प्राण्याला जीवदान मिळाले आहे. दाभड परिसरामध्ये महामार्गावर एक साळींदर अपघातात जखमी होऊन पडल्याची माहिती मृत्युंजय दुत,पत्रकार गोविंद टेकाळे आणि अजय शिंदे यांनी तात्काळ वन विभागाला दिली. या माहितीची तात्काळ दखल घेत वनपाल मारोती कवळे यांनी क्षणाचाही विलंब न करता आपले वनकर्मचारी विलास पाटील आणि सदानंद जोनपल्ले यांना घटनास्थळी रवाना केले. वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत जखमी साळींदरला सुरक्षितपणे ताब्यात केले. त्यानंतर त्यास तातडीने अर्धापूर येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे उपचारासाठी हलवण्यात आले. सध्या साळींदरवर योग्य ते वैद्यकीय उपचार सुरू आहेत. वनपाल मारोती कवळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रकृती पूर्णपणे सुधारल्यानंतर या साळींदरला त्याच्या नैसर्गिक अधिवासात नैसर्गिक सहवासात पुन्हा सुखरूप सोडण्यात येणार आहे. नागरिक आणि वन विभागाच्या या समयसूचकतेमुळे एका वन्यजीवाचा जीव वाचल्याबद्दल परिसरात समाधान व्यक्त होत आहे.



## नायगावात गुरुवारी साईबाबांच्या मूळ पादुकांचे आगमन

**नायगाव (स. गांवकरी) :** नायगाव शहरातील साईभक्तांसाठी गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी एक मंगलमय आणि भक्तिमय पर्व अनुभवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शिर्डी येथील साईबाबांच्या मूळ पादुकांचे नायगाव शहरातील पानसरे नगर येथील साईबाबा मंदिरात आगमन होणार असून, यानिमित्त शहरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. साईबाबांच्या पवित्र पादुकांच्या दर्शनासाठी परिसरातील भाविकांमध्ये मोठी उत्सुकता असून, या सोहळ्याच्या निमित्ताने नायगाव शहर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. साईबाबांच्या पवित्र पादुकांच्या आगमनानिमित्त गुरुवारी सकाळी ९ वाजता हेडगेवार चौक ते शिवाजी चौक मार्गे पानसरे नगर येथील साईबाबा मंदिरापर्यंत भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत साईभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन साईनामाचा जयघोष करावा आणि या मंगलमय सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. साईबाबांच्या मूळ पादुकांचे दर्शन हा भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक समाधानाचा अनमोल क्षण मानला जातो. या पवित्र पादुकांच्या दर्शनाने भाविकांना साईबाबांच्या आशीर्वादाचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे नायगाव शहरासह तालुक्यातील आणि परिसरातील साईभक्तांनी या धार्मिक सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता हेडगेवार चौकातून मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. शिवाजी चौक मार्गे ही मिरवणूक पानसरे नगर येथील साईबाबा मंदिरात पोहोचणार आहे. या ठिकाणी साईबाबांच्या मूळ पादुकांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी वेळेत उपस्थित राहून धार्मिक सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्वारातीम विद्यापीठाच्या सहा प्राध्यापकांना पेटंट

**नांदेड (स. गांवकरी) :** विविध भाषांमधील लेखनसंहिता अन्य भाषेमध्ये अधिक सहजपणे भाषांतरित करणाऱ्या 'हॅन्डहेल्ड स्क्रिप्ट ट्रान्सलेशन डिव्हाईस' साठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सहा प्राध्यापकांना पेटंट प्राप्त झाले आहे. भाषा, संगणकशास्त्र, शिक्षणशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयाच्या प्राध्यापकांनी एकत्र येऊन ही कल्पना साकार केली आहे. भाषा ही ध्वनी उच्चारण व लिपी यामुळे अन्य भाषिकांना अगम्य होते. अनेक वेळा एकाच भाषेसाठी विविध लिपींचे उपयोजन करण्यात येते, अशावेळी लिपी ज्ञात नसल्यामुळे स्वभाषिकांनाही लेखन संहितेचे आकलन होत नाही. भाषा व लिपीच्या संदर्भातील या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध ज्ञानशाखांमधील प्राध्यापकांनी एकत्र येऊन सर्वसामान्यांच्या कक्षेत येणाऱ्या 'हॅन्डहेल्ड स्क्रिप्ट ट्रान्सलेशन डिव्हाईस'ची कल्पना साकार केली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा संकुलाचे संचालक व मराठी विभागप्रमुख डॉ. पृथ्वीराज तौर, संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. निलेश देशमुख, शिक्षणशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. वैजयंता पाटील, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. शैलजा वाडीकर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. महेश जोशी आणि पीपल्स कॉलेजमधील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. स्वाती काटे यांच्या एकत्रित प्रयत्नातून 'ट्रान्सलेशन डिव्हाईस' साकारत आहे. भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून या संदर्भाने नुकतेच प्रमाणपत्र प्राप्त झाले. देवनागरी लिपी ज्ञात असणाऱ्या मात्र मोडी लिपी वाचता न येणाऱ्या मराठी भाषिक वाचक, अभ्यासक व संशोधकांना प्रथमदर्शनी स्क्रिप्ट ट्रान्सलेशन डिव्हाईसचा लाभ होणार आहे. भाषा, साहित्य व संस्कृतीच्या अभ्यासकांना तसेच विविध सामाजिक समूहांचे अध्ययन करण्यासाठी हे डिव्हाईस महत्वपूर्ण असणार आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापकांनी एकत्र येऊन केलेल्या या कार्यासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांनी प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

# ठाण्यात ६,१९२ झाडांचा काँक्रीटचा विळखा हटणार!

### आमदार निरंजन डावखरे यांच्या पाठपुराव्याला यश.

**ठाणे : (स. गांवकरी)**

रस्ते आणि पदपथांच्या काँक्रीटीकरणामुळे झाडांच्या खोडांभोवती पडलेला काँक्रीटचा विळखा अखेर हटविण्याच्या हालचालींना वेग आला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील नऊ प्रभाग समित्यांमधील तब्बल ६,१९२ झाडांभोवतीचे काँक्रीट हटविण्यासाठी ४४ लाख ७३ हजार २७ रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

> दरम्यान, पावसाळ्यात झाडे उन्मळून पडण्याच्या तसेच मोठ्या फांद्या तुटण्याच्या घटना लक्षात घेता ठाणे शहरातील धोकादायक झाडांचे व्यापक हेल्थ ऑडिट करण्याची मागणीही आमदार डावखरे यांनी केली आहे. शाळा, रुग्णालये, बस व रेल्वे स्थानके, उद्याने आणि गर्दीच्या ठिकाणांवरील झाडांची प्राधान्याने तपासणी करून धोकादायक झाडांवर तज्ज्ञांच्या अहवालानुसार आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे."शहराचा विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण आणि नागरिकांची सुरक्षितता यांना समान महत्त्व दिले पाहिजे. काँक्रीटचा विळखा हटविण्याच्या मागणीला महापालिकेने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, या कामाची प्रभावी अंमलबजावणी आणि धोकादायक झाडांचे हेल्थ ऑडिट करण्यासाठी पाठपुरावा सुरू राहील."
> — ॲड. निरंजन डावखरे, आमदार

महापालिकेच्या प्रस्तावानुसार उथळसर प्रभाग समितीत १,००६, कळवा ९३९, माजिवडा-मानपाडा ९१०, वर्तकनगर ७०१, मुंब्रा ६०९, नौपाडा-कोपरी ६००, लोकमान्यनगर-सावरकरनगर ५४०, वागळे ५१२ आणि दिवा प्रभाग समितीत ३७५ झाडांभोवतीचे काँक्रीट हटविण्यात येणार आहे. झाडांच्या खोडाभोवती काँक्रीट असल्याने पाणी आणि हवा मुळांपर्यंत पोहोचण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे झाडांच्या मुळांभोवतीची जमीन मोकळी केल्यास पावसाचे पाणी जमिनीत झिरपण्यास आणि वृक्षांच्या नैसर्गिक वाढीस मदत होणार आहे.




महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी प्रस्तावाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. पुढील मंजुरीनंतर प्रत्येक प्रभाग समितीसाठी स्वतंत्र निविदा काढण्यात येणार असून, प्रत्यक्ष काम कधी सुरू होते याकडे ठाणेकरांचे लक्ष लागले आहे.

## बक्षीहिप्परगे येथील राजगृह बुद्धविहारात तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा उत्साहात संपन्न

**सोलापूर : (स. गांवकरी)**

जगाला शांती, करुणा, समता आणि बंधुभावाचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा बक्षीहिप्परगे येथील वर्णद नगरमधील राजगृह बुद्धविहार येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या मंगलमय सोहळ्यास युवकांचे_ प्रेरणास्थान अक्कलकोटचे_ दानशूर_ रॉयल_नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती . यावेळी नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांनी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान विचारांना विनम्र अभिवादन केले. बुद्धांच्या विचारांमधून मिळणारी शांतता, करुणा आणि समतेची शिकवण समाजाला सदैव प्रेरणा देत राहील. असे गौरव उद्गार त्यांनी या वेळी काढले.



यावेळी जिल्हा परिषद सदस्य श्री. नेताजी खंडागळे, पंचायत समिती सदस्य श्री. विजय राठोड, सरपंच श्री. भाऊ जाधव, श्री. शिवाजी निकम, श्री. बाबासाहेब माने, श्री. नानासाहेब जाधव, श्री. राहुल जाधव, श्री. सीताराम राठोड, श्री. सिद्धाराम हेले, श्री. निशिकांत पाटील, श्री. विश्रांत गायकवाड (सर), श्री. बाळासाहेब गायकवाड, श्री. सिद्धार्थ तडसरे, श्री. भीमराव गायकवाड, श्री. सुहास गायकवाड, श्री. रमेश शिवशरण, श्री. कोंडीबा दुपारगुडे यांच्यासह बुद्धविहार समितीचे पदाधिकारी, व बुद्ध विहार परिवारातील सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यातून सुका व ओला चारा वाहतुकीवर बंदी; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी

**पुणे : (स. गांवकरी)**

जिल्ह्यातील भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर या आठ तालुक्यांमधील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून इतर कोणत्याही जिल्ह्यात किंवा राज्याबाहेर सर्व प्रकारचा सुका व ओला चारा, तसेच कडबा, कुट्टी आणि पेंढा यांसारख्या चारा प्रकारांची वाहतूक व विक्री करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.

पुणे जिल्ह्यात उत्पादित होणारा चारा इतर जिल्ह्यांत तसेच सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी पाठवला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात जिल्ह्यात चाऱ्याची टंचाई निर्माण होऊन पशुधनाच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. मात्र, शासकीय योजना, पशुसंवर्धन विभाग किंवा जिल्हा प्रशासनाने अधिकृत मंजुरी दिलेल्या चारा वाहतुकीला या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

या आदेशाची अंमलबजावणी पुढील आदेश जारी होईपर्यंत लागू राहणार असून, त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

## खानदेशी ब्लॉगर तुषार कोळी यांचा पाचोरा येथे विशेष सन्मान!

**रावेर : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने पाचोरा येथे आयोजित उत्तर महाराष्ट्र स्तरीय अधिवेशनात रावेर येथील श्रद्धा सबुरी बूट हाऊसचे संचालक आणि खानदेशी ब्लॉगर चि. तुषार रामचंद्र कोळी (rishi__1408) यांना विशेष सन्मान ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या या सन्मानामुळे रावेर परिसरातून आनंद व्यक्त केला जात आहे.

चि. तुषार रामचंद्र कोळी हे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य कार्यकारिणी सदस्य, उत्तर महाराष्ट्र संघटक तथा दैनिक लोकशाहीचे प्रतिनिधी मा. श्री. विनोद रामचंद्र कोळी (शिवा भाई G) यांचे लहान बंधू आहेत.




या अधिवेशनाला पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोर आप्पा पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष किशोर रायसाकडा तसेच उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भुवनेश यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

सोशल मीडियाच्या माध्यमातून खानदेशची संस्कृती, स्थानिक वैशिष्ट्ये आणि परिसरातील माहिती लोकांपर्यंत पोहोचविणाऱ्या तुषार कोळी यांचा या विशेष सन्मानाने गौरव झाला आहे.

या सन्मानाबद्दल चि. तुषार रामचंद्र कोळी यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## ज्येष्ठ पत्रकार दीपक नगरे यांना जीवनगौरव पुरस्कार; रावेरमध्ये भव्य सत्कार!

**रावेर : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने पाचोरा येथे आयोजित उत्तर महाराष्ट्रस्तरीय अधिवेशनात दैनिक लोकशाहीचे विभागीय संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार दीपक नगरे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या उल्लेखनीय सन्मानाबद्दल रावेर तालुक्यातील पत्रकार बांधवांच्या वतीने शासकीय विश्रामगृहात त्यांचा सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. पत्रकारांच्या समस्या, पत्रकार भवन, निवासस्थानांचा प्रश्न आणि पत्रकारितेसमोरील आव्हाने यांवरही या वेळी चर्चा करण्यात आली.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र संघटक तथा राज्य सदस्य विनोद कोळी (शिवाभाई) आणि नवनिर्वाचित जळगाव जिल्हा ग्रामीण अध्यक्ष विजय शामराव अवसरमल यांच्या हस्ते दीपक नगरे यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. पत्रकारितेच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरव झाल्याने उपस्थित पत्रकार बांधवांनी त्यांचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या जळगाव जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी विजय शामराव अवसरमल, तर रावेर तालुका अध्यक्षपदी प्रशांत दिलीप गाढे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवर व पत्रकार बांधवांनी दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थिती दिली होती.

# स्व.मयूरभाऊ पवार जयंतीनिमित्त जि.प. शाळेत वह्यांचे वाटप

**आळेफाटा : (स. गांवकरी)**

सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक प्रेम व सेवाभाव यांचा सुंदर संगम घडवून आणत स्व.मयूरभाऊ पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा नगदवाडी ता.जुन्नर,जि.पुणे येथे इयत्ता पहिली ते सातवीतील सर्व विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. हरिओम ग्रुप आळेफाटा व स्व.मयूरभाऊ पवार मित्रपरिवार यांच्या वतीने हा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. अशी माहिती नगदवाडी केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला बोऱ्हाडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांच्या शिक्षण प्रवासाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.स्व.मयूरभाऊ पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना प्राधान्य देत त्यांच्या स्मृतींना विधायक कार्यातून उजाळा देण्याचा आदर्श या उपक्रमातून घालून देण्यात आला.

शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे प्रभावी माध्यम असून विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजातील प्रत्येक घटकाची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. याच भावनेतून हरिओम ग्रुप आळेफाटा व स्व.मयूरभाऊ पवार मित्रपरिवाराने पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांना वह्या मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक साहित्यामध्ये भर पडली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच समाजातील सेवाभावी वृत्तीला बळ मिळते.




या कार्यक्रमास नगदवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख वनिता हांडे,नगदवाडी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,वडगाव आनंद गावचे माजी उपसरपंच गणेश भुजबळ,वडगाव आनंद विविध कार्यकारी सहकारी सोसायटी संचालक निमेश वाळुंज, स्व. मयूरभाऊ पवार यांचे बंधू निशांत पवार,चिरंजीव कुमार ऋग्वेद पवार,वडगाव-कांदळी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चेअरमन संजय मुटके यांच्यासह विविध मान्यवर,शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

स्व.मयूरभाऊ पवार यांच्या स्मृतींना अभिवादन करत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम समाजापुढे एक सकारात्मक संदेश देणारा ठरला.समाजातील दानशूर व्यक्ती,मित्रपरिवार आणि सेवाभावी संस्थांनी शैक्षणिक कार्यासाठी पुढाकार घेतल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना निश्चितच प्रोत्साहन मिळू शकते,हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

कार्यक्रमाचे नियोजन शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर, पंडित चौगुले, निलेश शेलार, विद्या वाघ, आशा आरेकर, उज्वला कांबळे व स्मिता काळे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश मेहेर यांनी केले तर आभार पंडित चौगुले यांनी मानले.

# सप्तश्रृंगगडावर भेसळखोरांचा सुळसुळाट; FDA ची धडक कारवाई!

नाशिक : (स. गांवकरी)

महाराष्ट्राच्या कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या बेसन-मावा विक्रीच्या गोरखधंद्यावर प्रशासनाचा वचक कुठे? नवरात्रोत्सव सुरू असताना लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सप्तश्रृंगगडावर भेसळयुक्त माव्याचा गंभीर प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाने (FDA)धडक कारवाई करत तब्बल १४०८ किलो भेसळयुक्त मावा जप्त केल्याची बातमी समोरआलीआहे. या कारवाईमुळे मिठाई आणि खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवरआलाअसून, भाविकांच्याआरोग्याशी खेळणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागलीआहे.

या कारवाईचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांमध्ये एकच चर्चा सुरू आहे. जर तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी पुढाकार घेऊन कारवाई करत असतील, तर इतर संबंधित अधिकारी नेमके काय करत आहेत? नागरिकांच्या करातून वेतन घेणाऱ्या यंत्रणेने आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या की प्रत्येक वेळी एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या धडक कारवाईची वाट पाहायची,असा सवाल उपस्थित होतआहे.

१४०८ किलो मावा जप्त; अन्नसुरक्षेचा प्रश्न गंभीर, सप्तश्रृंगगडावर नवरात्रोत्सवाच्या काळात भाविकांची मोठी गर्दी होतअसते. दर्शनासाठी येणारे भाविक प्रसाद, मिठाई आणि इतर खाद्यपदार्थ खरेदी करतात.अशा संवेदनशील ठिकाणी भेसळयुक्त माव्याचा साठाआढळणे ही केवळ अन्न व औषध प्रशासनाची कारवाई म्हणून पाहून चालणार नाही; हा सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर विषय आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने तपासणीदरम्यान माव्याचा मोठा साठा जप्त केला. वृत्तात १८ अन्न नमुने संकलित केल्याचाही उल्लेख आहे. या नमुन्यांच्या प्रयोगशाळेतील तपासणीअहवालातून खाद्यपदार्थांची गुणवत्ता आणि भेसळीचे स्वरूप स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे.मात्र, एवढ्या



मोठ्या प्रमाणावर संशयास्पद मावा उपलब्ध होईपर्यंत संबंधित यंत्रणांचे नियमित निरीक्षण कुठे होते, हा प्रश्नअनुत्तरित आहे.कारवाई होणे आवश्यकच; पण अशा प्रकारांना सुरुवातीलाच आळा घालणारी यंत्रणा अधिक प्रभावीअसणे तितकेच गरजेचे आहे.

एकट्या तुकाराम मुंढे यांनी कारवाई करायची,बाकीच्यांनी काय झोपा काढायच्या?

नागरिकांचा संताप केवळ भेसळयुक्त मावा जप्त झाल्यामुळे नाही, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबतही आहे. एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पुढाकारामुळे कारवाईला गती मिळत असेल, तर स्थानिक पातळीवरील संबंधित अधिकाऱ्यांच्या नियमित तपासणीची जबाबदारी नेमकी कोण पार पाडणार?

'सगळं तुकाराम मुंढे यांनीच करायचं, मग बाकीच्याअधिकाऱ्यांनी काय झोपा काढायच्या?'असा बोचरा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

## थोडक्यात बातम्या...



### आंबेगाव तालुका दुष्काळी जाहीर करा; ठाकरे गटाचा घोडेगाव येथे मोर्चा

आंबेगाव (स. गांवकरी) : राज्य सरकारने राज्यात विविध तालुक्यात दुष्काळ जाहीर केलास ना आंबेगाव तालुक्याला मात्र यातून वगळल्या असून आंबेगाव तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे सरकारने आंबेगाव तालुक्याला देखील दुष्काळी तालुका म्हणून जाहीर करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली असून याबाबत घोडेगाव येथे मोर्चा काढण्यात आला असून याबाबत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मशागती करून पेरण्या केल्या. सुरुवातीच्या पावसामुळे धरणांमध्ये पाणीसाठा झाला. मात्र, त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने पिकांना आवश्यक पाणी मिळत नाही. परिणामी, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पिके वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. आदिवासी भागातील भात पिके पाण्याअभावी पिवळी पडू लागली असून, काही ठिकाणी पिके जळून गेल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याबाबत बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते प्रा. राजाराम बाणखेले म्हणाले की, तालुक्यात सुरुवातीला झालेल्या पावसामुळे धरणे भरली आणि पेरण्यांबाबत सकारात्मक परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे पावसाची परिस्थिती अनुकूल असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, त्यानंतर पाऊस न झाल्याने शेतीवर संकट ओढवले आहे. आदिवासी भागातील भात पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली असता पाण्याअभावी पिकांचे नुकसान होत असल्याचे दिसून आले. याशिवाय, महावितरणकडून सिंगल फेज वीजजोडण्या बंद केल्या जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. धरणांतील पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत असल्याने भविष्यात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे, असेही बाणखेले यांनी सांगितले. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नंदकुमार बोऱ्हाडे, महिला आघाडीच्या कलावतीताई पोटकुले, संदीप भैय्या शिंदे, सचिन घोलप, विनोद घुले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रब्बी हंगामात अधिक पाणी लागणाऱ्या पिकांची लागवड टाळा

नांदेड (स. गांवकरी) : नांदेड जिल्ह्यात परतीच्या मान्सूनचा पुरेसा पाऊस झालेला नसल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून भूजल पातळीत सरासरी २.५ मीटरने घट झाली आहे. आगामी रब्बी हंगामातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता शेतकऱ्यांनी ऊस, गहू, मका, चिया यांसारख्या अधिक पाणी लागणाऱ्या पिकांची लागवड टाळावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी पीक निवड करताना जमिनीचा प्रकार, जमिनीतील उपलब्ध ओलावा आणि सिंचनासाठी उपलब्ध पाण्याचे प्रमाण यांचा विचार करावा. जमिनीत पुरेसा ओलावा उपलब्ध नसल्यास पेरणीची घाई करू नये. संभाव्य एल निनोच्या अंदाजावर पूर्णपणे अवलंबून न राहता प्रत्यक्ष पर्जन्यमान व उपलब्ध पाण्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करूनच रब्बी पिकांची निवड करावी. मध्यम काळी जमीन, मर्यादित पाणी उपलब्धता तसेच जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन स्थानिक कृषी विद्यापीठाच्या शिफारशीप्रमाणे करडई, हरभरा आणि रब्बी ज्वारी या पिकांना प्राधान्य द्यावे. कोरडवाहू क्षेत्रासाठी शिफारस केलेल्या वाणांचीच निवड करावी. करडई : कमी पाण्यात घेता येणारे महत्त्वाचे तेलबिया पीक म्हणून करडईचा विचार करावा. मराठवाड्यासाठी परभणी सुवर्णा (PBNS-154), परभणी कुसुम (PBNS-12) तसेच विद्यापीठाच्या अधिकृत शिफारशींनुसार पीबीएनएस-८६ (पूर्णा) या वाणांचा विचार करता येईल. रब्बी ज्वारी : खोल काळ्या जमिनीत चांगला अवशिष्ट ओलावा उपलब्ध असल्यास रब्बी ज्वारीला प्राधान्य द्यावे. स्थानिक शिफारशींनुसार परभणी सुपर मोती (SPV-2407), परभणी मोती (SPV-1411) आणि पीकेव्ही क्रांती या वाणांचा विचार करावा. हरभरा : जमिनीत पुरेसा ओलावा उपलब्ध असलेल्या क्षेत्रात हरभरा हे महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. विजय, दिग्विजय, आकाश आणि जाकी-९२१८ यापैकी स्थानिक परिस्थिती, पीक कालावधी, कोरडवाहू क्षेत्रातील अनुकूलता तसेच विद्यापीठाच्या शिफारशी विचारात घेऊन योग्य वाणाची निवड करावी. संभाव्य एल निनोचा प्रभाव, पावसातील अनिश्चितता आणि आगामी रब्बी हंगामातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. पाणी उपलब्धतेपेक्षा अधिक पाण्याची गरज असलेले पीक घेणे टाळून उपलब्ध ओलावा आणि पाण्याच्या क्षमतेनुसार पीक नियोजन करावे, असेही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी सांगितले. जमिनीतील ओलावा, पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक शिफारशी यांचा ताळमेळ साधूनच रब्बी पिकांची निवड करावी. पेरणीपूर्वी परिस्थितीचे योग्य मूल्यमापन करणे हीच संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीची दिशा आहे,असे आवाहन त्यांनी केले आहे.

## माऊली प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरीब कुटुंबांना मोफत कपड्याचे वाटप...

------ : (स. गांवकरी)

राजगुरुनगर ( सं.गावकरी)खेड तालुक्यातील दुर्गम भागातील कुडे बुद्रुक येथील गरीब कुटुंबांना माऊली सेवा प्रतिष्ठान, माध्यमातून मोफत कपडे वाटपाचा उपक्रम नुकतेच राबविण्यात आला.

उपक्रमास जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा पुणे नाशिक महामार्गाचे समन्वयक आणि कुडे बुद्रुक गावचे सुपुत्र दिलीपरावजी मेदगे यांचे सहकार्य लाभले.



माऊली सेवा प्रतिष्ठान तालुक्यातील गरीब गरजू निराधार कुटुंबातील नागरिकांना मदतीचा हात देण्याचे कार्य गेली अनेक वर्षांपासून करीत आहे.प्रतिष्ठानच्या माध्यमातून मोफत कपडे, किराणा किट, आर्थिक मदत,निराधार व्यक्तींना राहण्याची सोय,वैफल्यग्रस्त नागरिकांना औषधोपचार असे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक कैलास दुधाळे यांनी वापरण्यायोग्य संकलित केलेले कपड्याची वर्गवारी करून लहानग्या पासून वयोवृधपर्यंत सुमारे ३०पोती कपडे माऊली प्रतिष्ठानच्या माध्यमातून तालुक्यातील पश्चिम भागातील ठाकरवाडी येथील गरीब कुटुंबांना वाटप करून मदत करण्यात आली.

या उपक्रमाला येथील नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला असून आर्थिक मंदीत कपडे मिळाल्याचा आनंद येथील नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

आपल्या सर्वांचे अनमोल सहकार्य आहेत असेच सहकार्य इथून पुढच्या काळामध्ये आपण सर्वांनी ठेवावे हीच अपेक्षा व्यक्त करतो. असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे यांनी आभार व्यक्त करताना सांगितले. यावेळी प्रगती फ्लेक्सचे मालक वासुदेव गोपाळे कडूस गावचे माजी ग्रामपंचायत सदस्य निवेदक चांगदेव ढमाले निवेदक व ॲडव्होकेट संदीप देशमुख, बाबाजी कातोरे, दिलीप राक्षे, सविताताई लोंढे तसेच. कुडे बुद्रुक येथील अनेक ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

## बनावट इन्स्टाग्राम आयडीद्वारे पिता-पुत्रीची बदनामी करण्याचा प्रयत्न

डांग : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यात सोशल मीडियाचा गैरवापर करून एका कुटुंबाची बदनामी करण्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. एका अज्ञात व्यक्तीने २२ वर्षीय तरुणीला लक्ष्य करत इन्स्टाग्रामवर बनावट खाते तयार केले. या खात्याद्वारे तरुणी तसेच तिच्या वडिलांचे फोटो अपलोड करून त्यांच्याबाबत अश्लील, अभद्र आणि अपमानास्पद मजकूर पोस्ट करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे तरुणी आणि तिच्या कुटुंबाची सामाजिक प्रतिष्ठा मलिन करण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ‘rupalgavit7596’ या नावाने इन्स्टाग्रामवर बनावट प्रोफाइल तयार करण्यात आले होते. या प्रोफाइलवरून संबंधित तरुणी आणि तिच्या वडिलांच्या फोटोंचा गैरवापर करून आक्षेपार्ह पोस्ट करण्यात आल्या. सुरुवातीला समाजात बदनामी होईल आणि विनाकारण चर्चा सुरू होईल, या भीतीने पीडित तरुणी व तिच्या कुटुंबीयांनी पोलीस तक्रार करण्यास संकोच केला.

मात्र, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तरुणीने कुटुंबीयांशी चर्चा केली आणि अखेर धैर्याने पुढे येत कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. तिने सर्वप्रथम सायबर गुन्ह्यांसाठीच्या राष्ट्रीय हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधून ऑनलाइन तक्रार नोंदवली. त्यानंतर बनावट इन्स्टाग्राम खात्यावरून करण्यात आलेल्या आक्षेपार्ह पोस्टचे स्क्रीनशॉट आणि इतर उपलब्ध पुरावे घेऊन पोलीस ठाण्यात धाव घेतली.पीडित तरुणी आणि तिच्या वडिलांनी या प्रकरणातील अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन तिच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## तलावातील पाण्यासाठी शेतकऱ्यांवर निर्बंध; खासगी टँकरला पाणी उपसा करण्याची मुभा?

तामसा : (स. गांवकरी)

एकीकडे कोरड्या दुष्काळाच्या झळा तीव्र होत असताना शेतकऱ्यांना तलावातील पाणी पिकांना देण्यास निर्बंध घातले जात आहेत. तर दुसरीकडे खासगी कंपनीला टँकरद्वारे तलावातील पाणी उपसा करण्याची मुभा दिल्याचा प्रकार समोर आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. तामसा परिसरात पावसाने दडी मारल्यामुळे शेतीपिके संकटात सापडली आहेत. तलावात उपलब्ध असलेले पाणी पिकांना देण्यासाठी शेतकरी धडपड करीत आहेत. मात्र, दुष्काळी परिस्थितीचे कारण पुढे करून शेतकऱ्यांना तलावातील पाणी उपसा करण्यास निर्बंध घातले जात असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिके पाण्याअभावी कोमेजण्याच्या मार्गावर आहेत.

अशा परिस्थितीत पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील पिंपराळा तलावातून एका खासगी कंपनीकडून टँकरद्वारे दररोज हजारो लिटर पाण्याचा उपसा केला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी वापरण्यास निर्बंध आणि खासगी कंपनीला पाणी उपशाची मुभा, असा दुजाभाव का? हा प्रश्न उपस्थित होत आहे. एका बाजूला शेतकऱ्यांना तलावातील पाण्याच्या वापरावर बंधने घातली जातात, तर दुसऱ्या बाजूला खासगी कंपनीला तलावातील पाणी टँकरद्वारे उपसा करण्याची परवानगी दिली असल्यास ती कोणत्या नियमांच्या आधारे देण्यात आली? परवानगी दिली नसेल तर हा पाणीउपसा कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? असे सवाल उपस्थित होत आहेत.

पिंपराळा तलावातील पाणी उपशासाठी संबंधित कंपनीला अधिकृत परवानगी देण्यात आली आहे का, परवानगी असल्यास तिच्या अटी काय आहेत, तसेच उपसा होणाऱ्या पाण्याचे प्रमाण किती आहे, याची चौकशी करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या पिकांना वाचविण्यासाठी पाण्याची गरज असताना नियमांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान होणार का? पाटबंधारे विभाग आणि संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे..

## राजुरीत फार्मासिस्ट रॅलीतून प्रतिजैविकांच्या योग्य वापराबाबत जनजागृती

आळेफाटा : (स. गांवकरी)

जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त ‘प्रतिजैविक प्रतिकारशक्तीविरुद्ध लढा’ या संकल्पनेतून राजुरी (ता. जुन्नर) येथे भव्य फार्मासिस्ट रॅलीचे आयोजन करण्यात आले. समर्थ शैक्षणिक संकुलातील समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी व समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे यांच्यासह विविध फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी रॅलीत सहभागी होत प्रतिजैविकांचा योग्य वापर, औषधोपचारांबाबत जागरूकता आणि प्रतिजैविक प्रतिकारशक्तीचे दुष्परिणाम यांविषयी जनजागृती केली. इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन (आयपीए), आळेफाटा स्थानिक शाखा, नॅशनल फार्मास्युटिकल वेल्फेअर असोसिएशन, जुन्नर, आंबेगाव व खेड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन (संलग्न सीएपीडी, पुणे) तसेच समर्थ शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.




या रॅलीमध्ये समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, विशाल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, आळे, जय हिंद कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव सहानी आणि श्री स्वामी समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, माळवाडी-बोटा येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध पथनाट्यांच्या माध्यमातून प्रतिजैविकांचा अनावश्यक व अयोग्य वापर टाळणे, औषधांचा जबाबदारीने वापर करणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधे घेणे याबाबत प्रभावी संदेश दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समर्थ शैक्षणिक संकुलाचे विश्वस्त वल्लभ शेळके होते. प्रमुख पाहुणे म्हणून केमिस्ट असोसिएशन, पुणेचे उपाध्यक्ष रमेशशेठ शेवाळे उपस्थित होते. शेळके यांनी फार्मासिस्टची सामाजिक जबाबदारी आणि औषधांच्या योग्य वापराबाबत जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट केले. शेवाळे यांनी प्रतिजैविकांचा अतिवापर, त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम आणि औषधांचा विवेकपूर्ण वापर करण्याची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. संतोष चोरडिया व डॉ. रूपाली थोरात यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी जुन्नर, आंबेगाव व खेड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संतोष चोरडिया, सचिव महादेव तांबे, खजिनदार निलेश गांधी, ज्येष्ठ फार्मासिस्ट रायचंदशेठ गांधी, जुन्नर तालुका अध्यक्ष रसिक गांधी, आंबेगाव तालुका अध्यक्ष पंढरीनाथ तळेकर, खेड तालुका अध्यक्ष अतुल पिंगळे, सीएपीडी पुणेचे सदस्य महेश शिंदे,माजी सभापती दिपक औटी, माजी सरपंच माऊली शेळके,जि. के.औटी,एम.डी.घंगाळे, ग्रामपंचायत सदस्य रंगनाथ पाटील औटी, माजी तंटामुक्ती उपाध्यक्ष गणेशराव हाडवळे, जनता विकास मंडळाचे सचिव प्रदीपशेठ डुंबरे, मच्छिंद्र हाडवळे, सचिन काळे आणि गणेश पोखरणा उपस्थित होते.

आयपीए आळेफाटा स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ. डी. डी. गायकवाड, डॉ. सुरेश जाधव, डॉ. तेजस पाचपुते व इतर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. कुलदीप रामटेके यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अश्विनी गायकवाड व प्रा. प्राची पडवळ यांनी सूत्रसंचालन केले, तर समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. संतोष घुले यांनी आभार मानले.

## पडघ्यात टी. ए. पाटील शाळेचे विज्ञान प्रदर्शन उत्साहात

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा येथील जीवन विद्या शिक्षण प्रसारक मंडळ संचलित टी. ए. पाटील इंग्लिश मीडियम शाळेचे वार्षिक विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या प्रदर्शनात इयत्ता तिसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानावर आधारित विविध प्रकल्प सादर करत आपल्या कल्पकतेचे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे दर्शन घडवले.

शनिवारी शाळेच्या परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाला पालक आणि विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. विविध विषयांवरील प्रकल्प पाहण्यासाठी पालकांनी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या प्रतिकृती, वैज्ञानिक संकल्पना आणि दैनंदिन जीवनातील समस्यांवर आधारित उपाययोजनांनी प्रदर्शनात विशेष आकर्षण निर्माण केले. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांमध्ये ‘द अर्थ रोटेशन’ या प्रकल्पाने प्रथम क्रमांक पटकावला. ‘स्मार्ट सिटी अँड स्कूल’ या प्रकल्पाला द्वितीय, तर ‘रिड्यूस, रियूज अँड रिसायकल’ या प्रकल्पाला तृतीय क्रमांक मिळाला. इयत्ता चौथीच्या गटात ‘इको फ्रेंडली हाऊस’ या प्रकल्पाने प्रथम, ‘सीड जर्मिनेशन’ने द्वितीय, तर ‘सोलर




सिस्टीम’ने तृतीय क्रमांक मिळवला.

इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटात ‘रिन्यूएबल एनर्जी’ या प्रकल्पाला प्रथम क्रमांक देण्यात आला. ‘रेन वॉटर हार्वेस्टिंग’ने द्वितीय, ‘डिव्हिजन मॉडेल’ने तृतीय, तर ‘टाइप्स ऑफ शेप्स’ या प्रकल्पाला उत्तेजनार्थ चतुर्थ क्रमांक मिळाला. इयत्ता आठवी ते दहावीच्या गटात ‘स्कूल वेबसाइट’ या प्रकल्पाने प्रथम, ‘स्मार्ट सिटी’ने द्वितीय, तर ‘वुमन सेफ्टी पाथवे’ने तृतीय क्रमांक पटकावला. ‘स्टेटस ऑफ देअर कंट्री’ या प्रकल्पाला उत्तेजनार्थ चतुर्थ क्रमांक देण्यात आला. या प्रदर्शनातील विशेष आकर्षण ठरले ते टी. ए. पाटील व राईज प्री-स्कूलच्या वतीने सादर करण्यात आलेले ‘जादूमागील विज्ञान’ (द सायन्स बिहाइंड मॅजिक) हे सादरीकरण. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध चमत्कारांसारखे भासणारे विज्ञानाधारित प्रयोग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या प्रयोगांमागे कोणतीही जादू नसून वैज्ञानिक तत्त्वे आणि विज्ञानाचीच किमया असल्याचे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रयोगांतून स्पष्ट केले.

या विज्ञान प्रदर्शनाला संस्थेचे उपाध्यक्ष शशांक तांबोळी, सचिव अविनाश महाजन आणि खजिनदार यशवंत गायकवाड यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना देणारे आणि विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करणारे हे प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : ३०० । किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार दि. १५ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजारांची मदत

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हातात दिवाळीपूर्वी पैसे मिळावेत, यासाठी राज्य सरकार प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात पाच हजार रुपये अग्रीम मदत म्हणून जमा करणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी हा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केंद्र सरकारकडून दुष्काळी मदत मिळवण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण असल्याने राज्य सरकारने हा पर्यायी निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. याशिवाय राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५ करण्यात आली असून, दुष्काळ निवारणासाठीच्या १२ सवलती लागू करण्यात आल्या आहेत.(उर्शींशपवीर ऋरवपरींळी)

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीचा आढावा आणि सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उपस्थित होते. यापूर्वी राज्यात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. मात्र, काही तालुक्यांमधून आलेल्या तक्रारींची दखल घेत 'ट्रिगर-१' आणि 'ट्रिगर-२' या दोन्ही निकषांचा पुन्हा आढावा घेण्यात आला. त्यानंतर आणखी ४० तालुक्यांचा समावेश करून एकूण ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळामुळे बाधित झालेल्या भागांतील शेतकऱ्यांना १२ सवलतींचा लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

गेल्या २५ वर्षांच्या नोंदी पाहिल्यास राज्यात साधारणपणे नोव्हेंबरच्या अखेरीस दुष्काळ जाहीर केला जात असे आणि त्यानंतर डिसेंबरमध्ये मदत दिली जात असे. यंदा मात्र परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दुष्काळ आधीच जाहीर करण्यात आला आणि त्यासंबंधीचा शासन निर्णय ऑक्टोबरमध्ये काढण्यात आला. बुधवारी पूरक शासन निर्णयही काढण्यात आला. मात्र, केंद्र सरकारकडून मदत मिळवण्यासाठी कायद्यानुसार ठरवलेले टप्पे आणि कालमर्यादा पूर्ण करावी लागते. त्यामुळे ही प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांना तातडीने पाच हजार रुपये देण्याचा निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**साडेतीन लाख शेतकऱ्यांची कर्जमाफीची यादी प्रमाणित** – शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया थांबलेली नसून, पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याचे काम सुरू आहे. नव्याने आणखी साडेतीन लाख शेतकऱ्यांची यादी प्रमाणित करण्यात आली असून, या यादीतील शेतकऱ्यांनाही लवकरच पैसे देण्यास सुरुवात होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय हा कर्जमाफीच्या प्रक्रियेपासून स्वतंत्र असून, सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार देणे हा त्यामागील उद्देश आहे.

**टँकरचा 'जीपीएस'द्वारे मागोवा–** दुष्काळग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढत असल्याने टँकरची संख्या वाढवण्यात येत आहे. मराठवाड्यातील बहुतांश भागांमध्ये निरीक्षण विहिरींमधील पाण्याची पातळी जमिनीपासून तीन मीटरपेक्षा खाली गेली आहे. अशा परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबरपासूनच टँकर सुरू करावे लागतात. त्यामुळे आवश्यकतेनुसार टँकर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यांचे जीपीएसच्या मदतीने मागोवा घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

पिण्यासाठी पाणी राखून ठेवता यावे, यासाठी पाणीपुरवठा व्यवस्थेतून पाणी घेतल्या जाणाऱ्या सुमारे १६ हजार अवैध जोडण्या तोडण्यात आल्या आहेत. यापुढेही कोणी अवैधरीत्या पाणी उपसा केल्यास त्याची जोडणी तोडण्यात येईल. हा निर्णय कठोर वाटू शकतो; मात्र दुष्काळी परिस्थितीत नागरिकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध ठेवणे आवश्यक असल्याने तो घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**सरसकट शैक्षणिक शुल्कमाफी लागू–** शैक्षणिक शुल्कमाफीसंदर्भात यापूर्वी काढलेल्या शासन निर्णयात १९९२ पासूनच्या काही अटींचा समावेश असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळत नसल्याचे सरकारच्या निदर्शनास आले होते. मंत्रिमंडळाने

> ■ **दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा**
> ■ **मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा; दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५**

या अटी काढून टाकण्याचा निर्णय घेतला असून, शुल्कमाफीचा निर्णय आता सरसकट लागू करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**चारा लागवड केल्यास सरकार हमीभावाने खरेदी करणार–** दुष्काळी भागांमध्ये जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता वाढवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मंत्रिमंडळाने चारा उपलब्धतेचा आढावा घेतला असून, काही भागांमध्ये सुमारे ९० दिवस पुरेल इतकाच चारा उपलब्ध आहे, तर काही भागांत सहा ते सात महिन्यांचा साठा आहे. त्यामुळे चाऱ्याची उपलब्धता वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. धरणक्षेत्रात पाणी उपलब्ध असलेल्या भागांमध्ये चारा पिकांची लागवड करावी, तसेच विहिरी किंवा अन्य जलस्रोतांमध्ये पाणी असलेल्या शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात ज्वारी किंवा चारा पिके घ्यावीत, असे आवाहन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी चाऱ्याची लागवड केल्यास उत्पादित झालेला चारा राज्य सरकार हमीभावाने खरेदी करेल, असा निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. याबाबत लवकरच स्वतंत्र घोषणा केली जाईल, असे



मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**कर्ज, वीजबिलासाठी वसुलीचा तगादा लावल्यास कारवाई–** दुष्काळाच्या काळात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी तगादा लावू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. काही जण अतिउत्साहाने वसुलीचा प्रयत्न करतात; असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशाराही फडणवीस यांनी दिला. खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांशी चर्चा करून त्यांनीही कर्जवसुलीसाठी बळजबरीचे मार्ग वापरू नयेत, यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांकडून वीजबिल वसुलीसाठी तगादा लावला जात नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांचे वीजबिल सरकार भरत असून, मागील थकबाकीसाठीही वसुलीचा तगादा लावला जात नाही. एखाद्या ठिकाणी कोणी अतिउत्साहाने वसुलीचा प्रयत्न करत असेल, तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.




# पुण्याच्या ईएसआयसी मेडिकल कॉलेजमध्ये ५० एमबीबीएस जागांना मंजुरी, मुख्यमंत्र्यांकडून खास 'नवरात्री भेट'

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने पुण्याच्या ईएसआयसी (ESIC) मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालयाला औपचारिक मान्यता दिली आहे. या महाविद्यालयात एमबीबीएसच्या तब्बल ५० नवीन जागा उपलब्ध होणार असून, यामुळे राज्यातील वैद्यकीय शिक्षणाच्या संधींमध्ये मोठी वाढ होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून या नवीन जागा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिल्या जातील. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे महाराष्ट्रातील हजारो गुणवंत विद्यार्थ्यांना डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करणे अधिक सुलभ होणार आहे.

**राज्याला मिळाली 'नवरात्रीची भेट'**

या महत्त्वपूर्ण घोषणेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या अधिकृत 'एक्स' (ट्विटर) हँडलवरून ट्विट केले आहे. या पोस्टमध्ये त्यांनी ही मंजुरी म्हणजे महाराष्ट्रातील जनतेसाठी एक बहुमूल्य नवरात्रीची भेट असल्याचे म्हटले आहे. तसेच, या निर्णयाबद्दल त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

**राज्यातील डॉक्टरांची संख्या वाढणार, आरोग्य यंत्रणा अधिक बळकट**

सध्याच्या काळात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची वाढती गरज पाहता, हा निर्णय अत्यंत दूरदर्शी मानला जात आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, या नवीन ५० जागांमुळे एमबीबीएसच्या इच्छुकांना खूप मोठी मदत होईल. तसेच, भविष्यात राज्यात उपलब्ध होणाऱ्या डॉक्टरांची संख्या वाढल्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्य यंत्रणा आणखी अधिक बळकट होण्यास मोठी मदत मिळणार आहे.

**शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू**

पुण्यातील या अत्याधुनिक ईएसआयसी हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजमध्ये जागतिक दर्जाच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. आता नवीन महाविद्यालयाच्या मान्यतेमुळे येथे वैद्यकीय शिक्षणाचा मार्ग अधिक सुखकर झाला आहे. शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आतापासूनच मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. महाराष्ट्राच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रासाठी हा एक ऐतिहासिक टप्पा ठरत आहे.






# रुंभोडीचे ग्रामदैवत : पदमावती देवी

**भारतीय जीवनात प्राचीन काळापासून लोकश्रद्धा, लोकधारणा यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. लोकजीवनातील ग्रामदेवता त्याच्या उपासना पद्धती, धर्मविधी, संस्कारविधी, विधी आचरणाचे स्वरूप, सण, उत्सव, व्रतवैकल्ये, जत्रा यात्रा नवस सायास इत्यादी लोकसाहित्याची सामुग्री धर्माशास्त्रातुन लोकजीवनातुन लोकसाहित्यात अवतरली आहे. जीवनातील विविध अवस्थात केल्या जाणाऱ्या संस्कारातही लोकधारणा असतात. लोकविश्वास, लोकरुढी, प्रथा, सण, उत्सव, व्रतवैकल्ये, नवससायास लोकधारणांशी निगडित असतात.**

पृथ्वी, आकाश, वनस्पती, पशुपक्षी, मानवनिर्मित वस्तु, आत्मा, परलोक, अपशकुन, भविष्यवाणी, जादुटोणा, रोग, सामाजिक व राजकीय तसेच व्यवसायीक उद्योग, सणवार, व्रतवैकल्ये, कथाण्या, गिते, म्हणी, वाक्प्रचार इत्यादी सर्व विषय लोकसंस्कृतीत येतात. पारंपारीक भारतीय ग्रामजीवनात लोक संस्कृतीचा अविष्कार, सणवार, चालीरीती, प्रतिकपुजा, निसर्गपुजा, जत्रा यात्रा इत्यादी मधुन होत असतो.

**ग्रामदैवते–** प्रत्येक गावागणिक ग्रामदैवते निर्माण झालेली असतात. स्थानपरत्वे काही देवता निर्माण झालेल्या असतात. त्यांचे महात्म त्या त्या ठिकाणी असते. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्याचा पश्चिम भाग डांगण म्हणुन ओळखला जातो. या डांगण भागात महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई, हरीश्चंद्रगड, रतनगड, पटाकिल्ला, अलंगड, कुलंगड, मदनगड अशी स्थाने आहेत. भंडारदरा धरण, रंधा धबधबा, घाटघर प्रकल्प, कोदणी प्रकल्प, निळवंडे धरण अशी पर्यटनस्थळे ही सर्वांना माहित आहेत. तसेच अकोले तालुक्यातील म्हाळादेवी येथील खंडोबा मंदिर, रतनगडचे खाली असलेले अमृतेश्वराचे मंदिर, अकोल्याजवळ असलेले अगस्ती ऋषी मंदिर, अकोले शहरातील गंगाधेश्वर मंदिर, सिद्धेश्वर, टाहाकारीचे जगदंबा मंदिर, अबितखिंडीचे भैरवनाथ मंदिर, कोतुळचे कोतुळेश्वर मंदिर, इंदोरीचे प्रतिपंढरपुर म्हणुन ओळखले जाणारे विठ्ठल मंदिर, म्हाळादेवीचे खंडेश्वर मंदिर, उंचखडक बु चे रानमाळ (राममंदिर), निब्रंळ (अंबीकामातादेवी), निळवंडे मारुती मंदिर, औरंगपुर– ओंकारेश्वर मंदिर, रुंभोंडीचे अमृतेश्वर मंदिर, महादेवाचे मंदिर, कान्होबाचे मंदिर, हनुमानाचे मंदिर अशी अनेक मंदिरे अकोले तालुक्यात असून ती भक्तांची श्रद्धास्थाने आहेत.

अकोले तालुक्याचा पश्चिमेस ७ कि.मी. अंतरावर रुंभोडी हे गांव प्रवरा नदी काठी वसलेले आहे. या गावात गणपती मंदिर, मारुती मंदिर, महादेवाचे मंदिर, बिरोबाचे मंदिर, पाणोबाचे मंदिर, अंबीकामाता मंदिर, सदोबाचे मंदिर, दत्त मंदिर, कळसुबाईचे मंदिर, वेताळबाबा, रामेश्वर मंदिर (मोढा), पदमावती मंदिर, खंडोबा मंदिर, मारींगबाबा, मसीद, पिर, राणुबाई असून ती भक्तांची श्रद्धास्थाने आहेत. तसेच मोठा गाडीवान, कालभैरव, मावलया, म्हसोबा, अमृतेश्वर या देवतांची स्थानेही येथे आढळतात.

या सर्व देवदेवतांची पुजा अर्चा, जत्रायात्रा लोक मोठ्या श्रध्देने करत असतात. रुंभोडी या गावातील सावंतवाडी, मोडा (देशमुखवस्ती), टेंभुटेक (गणेशनगर), रायता, मालुंजकरवाडी, लोहटेवाडी, दत्तवाडी, पुलाची वाडी, भोरगडा अशा वाड्यावस्त्यांवर लोकवस्ती विखुरलेली आहे. या वाड्यावस्त्यांवर काही देवतांची मंदिरे व स्थाने दिसून येतात. परंतु पदमावती देवीचे ही ग्रामदेवता म्हणुन वेगळे स्थान निर्माण झाले आहे.

**पदमावती देवीचे स्थान–** पदमावती देवी हे रुंभोडी गावाची ग्रामदेवता आहे. रुंभोडी गावापासून दीड कि.मी. अंतरावर प्रवरा नदीजवळ पदमावती देवीचे मंदिर आहे. जवळच प्रवरा नदीचा खोल असा डोह आहे. या देवीचे वैशिष्ट्य म्हणजे माहूरच्या रेणुका मातेचे एक प्रतिरुप मानले जाते.

आख्यायिका १) पूर्वी हे स्थान नाथपंथियांचा मठ आणि गुरुस्थान मानले जात असे. एकूण ४० एकर क्षेत्राचा हा भूभाग या मठाने व्यापलेला आहे. एकदा एक शेतकरी शेतीची नांगरणी करत असताना मंदिराच्या कळसाचे टोक नांगराच्या फाळाला लागले. त्या शेतकऱ्याला रात्री देवीने दृष्टांत दिला आणि कळसाच्या ठिकाणी खोदकाम करायला सांगितले. या दृष्टांताप्रमाणे त्या शेतकऱ्याने खोदकाम केले असता पदमावती देवीचे मंदिर आढळले. तेव्हापासून या पदमावती देवीची पुजाअर्चा, यात्रेला सुरुवात झाली. पदमावती देवीच्या समोर, कालभैरव, मोठा गाडीवान, व महादेवाची पिंड स्थापन केलेली आढळते. या देवीचे हे मंदिर ५०० वर्षापुर्वीचे असावे असे लोक सांगतात. दर यात्रेच्यावेळी प्रवरा नदीतुन पितळ, काशा व तांबे अशा तीन धातुंची भांडी पाण्यातुन वर येत असत. त्या भांड्यांमध्ये सर्वांना प्रसाद दिला जात असे. परंतु एका स्त्रीने यातील काही भांडी चोरले तेव्हापासून प्रवरा नदीतुन निघणारी ही भांडी निघत नाही अशी आख्यायिका वाडवडिलांपासून सांगितली जाते. ही भांडी नेमकी केव्हापासून निघण्याची बंद झाली हे मात्र कुणालाही सांगता येत नाही. परंतु त्या पाठीमागे ही कथा असावी किंवा अशा प्रकारच्या कथा तीर्थस्थानाच्या डोहाच्या बाबतीत महाराष्ट्रभर प्रचलीत आहेत. त्यामुळेच ही आख्यायिका येथेही आली असावी. परंतु येथे श्रद्धा मात्र आढळ आहे.

**२) सुसरखडकाची आख्यायिका–**

पदमावती देवीच्या मंदिराच्या पश्चिमेस एक मोठा खडक आहे. तिथे पूर्वी कधीतरी बैलगाडीने आलेले लग्नाचे वऱ्हाड विसाव्यासाठी या खडकावर उतरले होते. वऱ्हाडातील काही लोकांनी स्वयंपाक करायला सुरुवात केली. स्वयंपाक सुरु झाल्यावर खडकात असलेल्या सुसरीला उष्णतेच्या झळा लागल्या व त्या सुसरीने जवळच्या असलेल्या प्रवरेच्या डोहात उडी घेतली. काळ्यापाठीवर बसलेले सर्व वऱ्हाड पाण्यात बुडाले तेव्हापासून या खडकाला सुसरखडक असे नामाभिधान प्राप्त झाले.

आणि तेव्हापासून ते त्याच नावाने ओळखले जावू लागले. आजही अमावश्या व पौर्णिमेला वाद्यासारखा आवाज ऐकू येतो. अशी संकटे आपल्यावर परत येऊ नयेत यासाठी पदमावती देवीची आराधना लोक करतात अशी धारणा झालेली आहे. अशी आख्यायिका प्रचलित आहे.

**पदमावती यात्रा उत्सव–** दर चैत्र पौर्णिमेला पदमावती देवीची यात्रा भरत असते. ह्या देवीची यात्रा ही एकुणच गावाच्या उत्सवाचा विषय असतो. यात्रेच्या दिवशी मानाच्या काठ्यांची मिरवणुक निघते. वाजंत्री, पुजा अर्चा, आरती इ कार्यक्रमांनी वातावरण भारुन जाते. रुंभोडी गावातील वाड्यावस्त्यावरील व परिसरातील सर्व जण ह्या देवीची भक्तीभावाने पुजा अर्चा करुन आराधना करतात. यात्रेच्या वेळी एखादया स्त्री किंवा पुरुष भक्तांच्या अंगात वारं येत (संचार) यात्रेसाठी आलेल्या लोकांच्या समस्या किंवा प्रश्न मांडले जातात. वारं आलेली व्यक्ती लोकांच्या समस्यांवर उपाय, तोडगे, सांगते. आरती झाल्यावर गुळ, खोबरे शेरणीचा प्रसाद वाटला जातो. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी दुपारी एका मोठ्या शेतात कुस्त्यांचा आखाडा भरत असे. लहान व मोठ्यापासून सहभाग घेतात. त्यांना गुडीशेव, रेवड्या आणि रोख रक्कमेच्या स्वरुपात बक्षीस दिले जात. आता मात्र हा कुस्त्याच्या आखाडा बंद पडत चाललेला दिसतो. गावातील सर्वजण या पदमावती देवीची पुजाअर्चा करतात. पदमावती देवीचे हे स्थान जागृतस्थान मानले जाते. लग्नविधी झाल्यावर प्रथमत या देवीच्या दर्शनासाठी वधुवर जातात. अशी आजही ही प्रथा रुढ आहे. तसेच नवजात अर्भकाला देवीच्या पायावर आणुन ठेवण्याचीही प्रथा रुढ आहे. देवीचे मनोभावे दर्शन घेतात. नारळखणाने देवीची ओटी भरतात. ही देवी नवसाला पावते अशीही लोकांची श्रद्धा आहे. म्हणुन या देवीला अनेक लोक नवस करतात. व नवस पुर्ण झाल्यावर नवस फेडण्यासाठी मोठ्या संख्येने या स्थानी लोक येथे असतात. देवीची नारळखणाने ओटी भरतात.

गावोगावी होणाऱ्या जत्रा यात्रा ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. ग्रामदेवतांच्या पालखीतुन काढण्यात येणाऱ्या मिरवणुका या वैशिष्टपुर्ण समजल्या जातात. त्यानुसार गावातील उत्सवी वातावरणातील जत्रा यात्रा दरवर्षी साजऱ्या केल्या जातात. त्यात क्षेत्रीय दैवते, स्थानिक दैवते, ग्रामदेवते, उपास्य दैवते यांच्या परंपरा यातुन मराठी संस्कृतीची ओळख होते.

**दैवतकथांचे प्रकार-**

**१) उत्पत्ती व प्रलय कथा**

**२) पंचमहाभूते, दैवते, पुराणे इतिहास– महाकाय दैवते**

**३) दैवतमहात्म कथा – विभुती दैवते, प्राणिदैवते, वृक्षदैवते, पर्वत, नद्या, ग्रामस्थान इत्यादी दैवतकथा**

**४) भुतकथा**

**५) परिकथा**

**६) तारे, नक्षत्र, ज्योतीकथा**

**७) शास्त्र, कला, धर्म, तत्वज्ञान, विपत्ती, कथा आदी दैवतकथांचे प्रकार समाविष्ट होतात. दंतकथा यामध्ये भटकी दंतकथा, स्थानिक दंतकथा, प्राणि कथा, हास्यकथा व संकीर्ण कथांचा समावेश करता येतो.**

दैवतकथांमध्येच रामायण, महाभारत व पुराणे यातील लोकसाहित्यात सापडणाऱ्या कथांचा व गाण्यातील संदर्भाचा



अंतर्भाव करता येतो. अशा प्रकारच्या कथा संबंध भारतात सर्वदुर प्रचलीत आहेत. अखंड भारतभार जणु या काळातील संस्कृती रोमारोमात भिनली आहे, असे वाटाव्या इतक्या या कथा प्रचलीत आहेत. दैवतकथा आणि कथा या सर्वांचाच संबंध डोंगरदऱ्या, नद्या, ग्रामे किंवा यातुन विखुरलेली स्थाने यांच्याशी लावलेला आढळतो. जागतीक लोककथांचे क्षेत्र पाहता भारतीय लोकवाडमयामध्ये हे वेगळेपण भासेल अशा स्वरुपात रामायण, महाभारतातील संदर्भ या स्थानांशी निगडीत दिसतात. परंतु दैवतकथांसारखेच त्यांचे स्वरुप तयार होते.

**कथांमागील प्रेरणा–** कथांमागे १) अद्भूताची प्रेरणा २) देवधर्माची प्रेरणा ३) कौटुंबीक व प्रापंचिक प्रेरणा असतात. यात कौटुंबीक प्रेरणा सर्वात बळीष्ठ असते. म्हणूनच लोकसाहित्यातील ही धर्मश्रद्धा लोकसंस्कृतीत अतिशय गुंतागुंतीची गोधळात टाकणारी परंतु अविभाज्य अशी झाली आहे. लोकसाहित्यातील धर्मश्रद्धांदाचा तसेच कथा आणि गाणी का, केव्हा व कशी निर्माण झाली त्यांची परंपरा कोणत्या स्वरुपात अस्तित्वांत राहते व त्यांचा लोकसंस्कृतीशी संबंध काय? या प्रश्नांचा विचार करुन अन्वयार्थ लावावा लागतो हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**खालील हस्तलिखित टीप (Handwritten Note):**
**घटस्थापनेच्या पुर्वक कुटुंबातील माहिला १५–१६ आपल्या कुटुंबासमवेत दर्शनाला जातात. देवीला शिलंगण वाढतात व त्यानंतर घरी जावुन घरातील देव्हाऱ्यातील देवाला शिलंगण वाढतात –**

**भाऊसाहेब वाकचौरे (रुंभोडी)**

# मतदारसंघात टँकर, चारा छावण्या सुरू कराव्यात

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची आमदार दातेंनी घेतली भेट

पारनेर (समर्थ गांवकरी)

**बुधवार दि. १४ आक्टो. २०२६ पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या दुष्काळी परिस्थितीची दखल घेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांची मुंबई येथे भेट घेऊन मतदारसंघातील जनतेच्या व्यथा आणि पाणीटंचाईचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले. दुष्काळाच्या झळांनी सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि पशुपालक त्रस्त होत असताना जनतेला दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली यावेळी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड उपस्थित होते.**

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, यासाठी लवकरात लवकर पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत, तसेच पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक असलेल्या इतर उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी आग्रही मागणी आमदार दाते यांनी यावेळी केली.

दुष्काळाचा फटका केवळ नागरिकांनाच नव्हे, तर पशुधनालाही बसत आहे. जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संगोपन करणे शक्य व्हावे आणि पशुपालकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये, यासाठी चारा छावण्या किंवा चारा डेपो लवकरात लवकर सुरू करण्याची मागणीही त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली.



दुष्काळाच्या कठीण काळात नागरिकांना पिण्याचे पाणी आणि पशुधनाला चारा उपलब्ध करून देणे ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून ग्रामीण जनजीवन टिकवून ठेवण्याची गरज आहे. दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि ग्रामीण जनजीवन यांचे प्रश्न अत्यंत संवेदनशील बनतात. अशा वेळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने वेळ न दवडता निर्णय घेणे आवश्यक आहे.

**–आमदार काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

# १० कोटींच्या रस्ते विकासकामांना राज्याची प्राथमिक मंजुरी : आ. दाते

पारनेर (समर्थ गांवकरी)

बुधवार दि. १४ आक्टो. २०२६ पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकासाला चालना देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर सातत्याने प्रयत्नशील असून, मतदारसंघातील चार रस्त्यांच्या सुधारणांसह एका पुलाच्या बांधकामासाठी एकूण १० कोटी रुपयांच्या कामांना राज्य शासनाची प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. या कामांचे प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

केंद्रीय मार्ग निधी योजनेअंतर्गत (CRIF) पारनेर तालुक्यातील रस्ते व पुलांच्या कामांसाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी पाठपुरावा केला असुन राज्य शासनाकडून प्राथमिक मंजुरी मिळाल्याने संबंधित विकासकामांच्या पुढील प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

या प्रस्तावांमध्ये राहता–लोहारे–मांडवा– पारनेर–श्रीगोंदा रस्त्यावरील राज्य मार्ग क्र. ६७ च्या कि.मी. ७९/५०० येथे पोहोचमार्गासह टाकळी ढोकेश्वर कान्हुरपठार रोडवरील सबस्टेशनच्या पुढील बाजूस असलेल्या लहान पुलाचे बांधकाम करण्यासाठी १ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. तसेच कौठा–अनगरे–आर्वी–अजनुज–श्रीगोंदा–सुराडी–कोळगाव–सुरेगाव–उख्खलगाव–रांजणगाव–वाळवणे ते राज्य मार्ग क्र. ६९ ला जोडणाऱ्या रस्त्याच्या



राज्य मार्ग क्र. ४७९ वरील कि.मी. ५७/९०० ते ६०/४५० या टप्प्याच्या सुधारणेसाठी ३ कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे.

# अग्नीपंखच्या प्रेरणा उत्सवात ३२५ विद्यार्थ्यांचा सन्मान

## 'संधी आहे, पण अभ्यास करा!' तहसीलदार सचिन डोंगरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करून त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने अग्नीपंख फाउंडेशनच्या वतीने श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालयाच्या सभागृहात आयोजित प्रेरणा उत्सवात विविध स्पर्धा परीक्षा, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा आणि इस्त्रो सहलीसाठी निवड झालेल्या श्रीगोंदा तालुक्यातील ३२५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना सन्मानपत्र आणि मानाची कॅप देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्यात तहसीलदार सचिन डोंगरे, ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस, गटविकास अधिकारी राणी फराटे, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी आणि अग्नीपंख फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. संजय लाकुडझोडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

शिष्यवृत्ती परीक्षा हा स्पर्धा परीक्षांचा पाया : सचिन डोंगरे

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तहसीलदार सचिन डोंगरे म्हणाले, की यूपीएससी आणि एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षांमधील गुणवत्ता हा महत्त्वाचा पाया ठरतो. शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये गुणवत्ता



सिद्ध केलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य राखले, तर भविष्यात प्रशासकीय अधिकारी होण्याची मोठी संधी त्यांच्यासमोर आहे. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करावे आणि ध्येय साध्य करण्यासाठी नियमित अभ्यास करावा.

विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान देण्यासाठी शिक्षकांनीही स्वतः नियमित वाचन करणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार ज्ञान अद्ययावत ठेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहनही डोंगरे यांनी केले.

अग्नीपंखच्या उपक्रमांचे कौतुक

ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस यांनी अग्नीपंख फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थी आणि शाळांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला वाव देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य डी. डी. भुजबळ यांनी केले. सूत्रसंचालन सुधीर साबळे आणि विजया शेलार यांनी केले, तर अग्नीपंख फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. संजय लाकुडझोडे यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. उत्तम वडवकर, धर्मनाथ काकडे, एन. टी. शेलार, मधुकर सुपेकर, बापूसाहेब गायकवाड, मधुकर काळाणे, पीटर रणसिंग, आबासाहेब जगताप, वर्षा भोयटे, शशिकांत पवार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

विविध क्षेत्रांत यश मिळविणाऱ्या गुणवंतांचा गौरव

या प्रेरणा उत्सवात यूपीएससी परीक्षेतील यशासाठी सुशांत वडवकर, एनआयडीसाठी प्रियदर्शिनी काकडे, न्यायाधीश म्हणून निवड झालेल्या शितल थोरात, तसेच वसुधा इथापे, हिताक्षी दरेकर, एनआयएफटीसाठी ओम मोहिते, एअर फोर्ससाठी निवड झालेल्या काकडे यांच्यासह विविध क्षेत्रांत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

एमपीएससी क्षेत्रातील यशासाठी अक्षय शिंदे, सुरज घोडके, अभिजित वाळके, उमेश ढवळे, किरण जाधव, नीलम पवळे आणि रुपाली गोलांडे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच बँकिंग क्षेत्रातील यशासाठी तेजस औटी यांचाही गौरव करण्यात आला.

# कथा नवरात्रीच्या, वध तारकासुराचा, तारकासूर संहारींणी

देवी स्कंदमाता

स्कंदमाता देवी हेपाचव्या दिवशी पुजले जाणारी दुर्गेचे पाचवे व तितकेच महत्वाचे रूप मानले जाते,देवी स्कंद(कार्तिकेय) ला धरून बसलेली आहे,*जी मातृत्व वात्सल्य आणि करुणेचे प्रतीक आहे, स्कंद मातेला ज्ञान व बुद्धीची

**अधिष्ठात्रीं देवता मानली जाते**

या दिवशी तिने पिवळे वस्त्र परिधान केलेले असल्याने भक्तगण त्याच वेशभूषेत तिचे पूजन करतात

धर्मशास्त्रानुसार, देवी स्कंदमातेच्या उत्पत्तीमागे एक अतिशय महत्त्वाची आणि रोचक कथा आहे.

**तारकासुराचा अत्याचार आणि वरदान**

प्राचीन काळी तारकासूर नावाच्या एका अत्यंत शक्तिशाली आणि क्रूर असुराने ब्रह्मदेवांना प्रसन्न करण्यासाठी अत्यंत कठोर तपश्चर्या केली. त्याच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन ब्रह्मदेवाने त्याला हवे असलेले वरदान मागण्यास सांगितले. तारकासुराने अमरत्वाचे वरदान मागितले, परंतु सृष्टीच्या नियमानुसार जन्माला आलेल्या प्रत्येकाचा मृत्यू निश्चित असल्याने ब्रह्मदेवाने त्याला अमर वर देण्यास नकार दिला व दुसरा वर मागण्यास सांगितले

तेव्हा तारकासुराने असा वर मागितला की माझा मृत्यू केवळ भगवान शिव यांच्या पुत्राकडूनच होऊ शकेल,इतर कोणीही मला मारुच शकणार नाही ही असा वर मागितला,

कारण तारकासुराला वाटत होते की भगवान शिव हे सदाशिव आणि विरागी आहेत, ते कधीही विवाह करणार नाही आणि त्यामुळे त्यांना कधीही पुत्र होणार नाही त्यामुळे आपल्याला कोणीही मारणार

**कथापुष्प पाचवे, माळ पाचवी**




नाही,

आणी ब्रम्हदेवाने फार विचार न करता तसे वरदान तथास्तु म्हटले तारकासुराला वरदान मिळाले

या वरदानामुळे स्वतःला अमर समजून तारकासुराने तिन्ही लोकांवर आधिपत्य गाजवले आणि देव देवी, देव–ऋषीं मुनींनाही त्राही त्राही करून त्रासून सोडले.

देवांचे संकट आणि शिव–पार्वती विवाह

तारकासुराच्या त्रासाला कंटाळून सर्व देव भगवान ब्रह्मदेव आणि विष्णू यांच्यासह भगवान शिवासमोर शरण गेले. देवांच्या रक्षणार्थ आणि तारकासुराचा संहार करण्यासाठी भगवान शिवाने माता पार्वतीशी विवाह केला. त्यांच्या तेजातून आणि दैवी ऊर्जे पासून देवांचे सेनापती कार्तिकेय (स्कंद) यांचा जन्म झाला.

**तारकासुर संहारींनी स्कंदमाता देवी**

मातृत्वाचे आणि शक्तीचे प्रतीक: कार्तिकेयांचा सांभाळ आणि संगोपन माता पार्वतीने अत्यंत प्रेमाने आणि कुशलतेने केले. तिने आपल्या पुत्राला (स्कंद) युद्धाचे धडे, अस्त्र–शस्त्र चालवण्याचे कौशल्य आणि दिव्य ज्ञान दिले.

बालकुमार कार्तिकेयला म्हणजेच स्कंदाला आपल्या कुशीत व मांडीवर घेऊन ममता दिली त्यामुळे माता पार्वतीच्या या रुपाला

स्कंद माता म्हणून ओळखले जाऊ लागले,

**असुर संहारक कार्तिकेय*️**

आई स्कंद मातेकडून मिळालेली अफाट शक्ती, आशीर्वाद, व ज्ञान व मनोकामना या बळावर स्कंदाने महाबलशाली तारकासुराचा वध केला,आणी देव देवतांना व सृष्टीला

असुर म्हणजेच राक्षसा पासून वाचविले,

त्यामुळे स्कंद मातेच्या पूजनाला विशेष महत्व दिले जाते, तिची भक्ती व मनोभावे पूजा केल्याने आईचे वात्सल्य तर मिळतेच पण ज्ञान, बुद्धी, आणी संकटाला सामोरे जाण्याची अफाट शक्ती भक्ताला प्राप्त होते

पुढील म्हणजेच ६ व्या भागात आपण

देवी कात्यायनी माता हिचे महत्व जाणून घेणार आहोत.

**वृत्त संकलन, कोतुळ प्रतिनिधी अशोकराव शेळके**

# आळेफाट्यात जुन्या वाहनांच्या स्क्रॅप प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह; संबंधित यंत्रणांनी चौकशी करण्याची मागणी

## जुन्या वाहनांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात; स्क्रॅप अधिकृत प्रक्रियेनुसार केले जाते का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा



**आळेफाटा (समर्थ गांवकरी)**

पुणे, नाशिक, अहिल्यानगर आणि कल्याण या प्रमुख शहरांना जोडणाऱ्या महामार्गांच्या परिसरात वसलेले आळेफाटा हे जंक्शन गेल्या काही वर्षांत वेगाने विकसित होत आहे. महामार्गावरील दळणवळण आणि वाढत्या व्यावसायिक संधींमुळे या परिसरात वाहन खरेदी-विक्री तसेच गॅरेज व्यवसाय मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याचे दिसून येत आहे. याचबरोबर जुन्या वाहनांची खरेदी-विक्रीही मोठ्या प्रमाणात होत असल्याने जुन्या वाहनांचे स्क्रॅप अधिकृत प्रक्रियेनुसार केले जाते का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

जुन्या वाहनांच्या स्क्रॅप प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी

आळेफाटा परिसरात जुन्या वाहनांच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर वापरातून बाद झालेल्या जुन्या वाहनांचे स्क्रॅप अधिकृत आणि नियमानुसार केले जाते का, त्यासाठी आवश्यक प्रक्रिया पाळली जाते का, तसेच वाहनांचे सुटे भाग आणि इतर सामग्री यांची विल्हेवाट नियमानुसार लावली जाते का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित कायदे आणि नियमांनुसार योग्य ती कारवाई करावी, असेही नागरिकांचे मत आहे.

वाढत्या शहरीकरणासोबत नियोजनाची गरज

आळेफाटा हे पुणे, नाशिक, अहिल्यानगर आणि कल्याण या प्रमुख शहरांच्या संपर्कमार्गांवरील महत्त्वाचे ठिकाण असल्याने या परिसरात नागरीकरण आणि व्यावसायिक हालचाली वाढत आहेत. आळे आणि वडगाव यांसारखी जवळची गावेही या परिसराच्या विकासाशी जोडली जात आहेत. रोजगार आणि व्यवसायाच्या निमित्ताने विविध राज्यांतील नागरिक येथे वास्तव्यास असल्याने परिसरातील आर्थिक घडामोडींनाही चालना मिळत आहे. या वाढत्या व्यावसायिक विस्तारासोबत पर्यावरणीय नियमांचे पालन, वाहनांच्या विल्हेवाटीची योग्य प्रक्रिया आणि संबंधित व्यवसायांमधील नियमपालन यावर लक्ष देणे आवश्यक ठरत आहे.

संबंधित यंत्रणांनी वस्तुस्थिती स्पष्ट करावी

जुन्या वाहनांचे स्क्रॅप अधिकृत पद्धतीने केले जाते का, याबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने तपासणी करणे गरजेचे आहे. प्रकरणाची सत्यता पडताळून नियमांचे पालन होत असल्याची खात्री करावी आणि काही अनियमितता आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

आळेफाटा परिसराचा वाढता व्यावसायिक विस्तार लक्षात घेता जुन्या वाहनांच्या स्क्रॅप प्रक्रियेबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे. संबंधित यंत्रणांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी आणि नागरिकांच्या मनातील शंकांचे निरसन करावे, अशी मागणी पुढे येत आहे.

# दुर्गादेवी मंदिरात कुलस्वामिनी महिला भजनी मंडळाचा भक्तिमय जागर

## भजनांच्या सुरांतून आई जगदंबेचा जयघोष



**नेवासा (समर्थ गांवकरी)**

शारदीय नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त नेवासा येथील दुर्गादेवी मंदिरात कुलस्वामिनी महिला भजनी मंडळाच्या वतीने भक्तिमय जागर आयोजित करण्यात आला. यावेळी महिला भजनी मंडळातील महिलांनी विविध देवीभक्तिपर भजने सादर करून संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन काढला.

आई जगदंबेच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होत महिलांनी आपल्या सुमधुर भजनांतून आदिशक्तीचा महिमा गायिला.भजनांच्या सुरांनी आणि 'आई जगदंबेचा उदो उदो', 'जय माता दी' अशा जयघोषांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. या जागरामुळे नवरात्रोत्सवातील उत्साहाला भक्तीची सुंदर किनार लाभली.

कुलस्वामिनी महिला भजनी मंडळाच्या या भक्तिमय उपक्रमातून महिलांची धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि सामूहिक भक्तिभावाचे दर्शन घडले. देवीच्या आराधनेने आणि भजनांच्या गजराने वातावरण अधिकच मंगलमय झाले.

कुलस्वामिनी महिला भजनी मंडळाच्या या झालेल्या जागर प्रसंगी मार्गदर्शक सौ. साधनाताई मुळे,श्रीमती कावेरी मापारी,सौ. संगीता चव्हाण,सौ.कल्पना पोतदार, सौ. सीमा कदम,श्रीमती शिलाताई चव्हाण,नंदाताई गायकवाड, सरिता जोशी,सौ.स्मितताई किरण कुंभकर्ण,

स्मिता करंडे,मोहिनी रासने,वृषाली पोतदार, छाया कोकाटे,वृषाली पोतदार आरती जोशी उपस्थित होत्या

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## जागतिक हात धुवा दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यात स्वच्छता व हात धुण्याबाबत जनजागृती उपक्रम



**ठाणे (समर्थ गांवकरी)**

जागतिक हात धुवा दिनानिमित्त १५ ऑक्टोबर रोजी ठाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे, शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये स्वच्छता व हात धुण्याच्या सवयींबाबत जनजागृती करणारे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी रुजविणे, हात धुण्याचे महत्त्व नागरिकांना पटवून देणे आणि स्वच्छतेबाबत जनजागृती वाढविणे, हा या उपक्रमांचा प्रमुख उद्देश आहे. जिल्हा परिषद, ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित विभागांच्या समन्वयातून हे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. स्वच्छतेच्या सवयी दैनंदिन जीवनात अंगीकारून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. जागतिक हात धुवा दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक देणे, ग्रामसभांमधून स्वच्छतेविषयी जनजागृती करणे, समुदाय बैठका आयोजित करणे आणि शाळांमधून जनजागृती रॅली काढणे अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. हातांची स्वच्छता राखल्याने संसर्गजन्य आजारांचा धोका कमी करण्यास मदत होते. त्यामुळे जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर तसेच हात अस्वच्छ झाल्यावर साबणाने हात धुण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

## सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी यांचा ठिकठिकाणी सत्कार

**वाशीम(समर्थ गांवकरी)**

पत्रकाराच्या न्याय हक्कासाठी लढणारी व सर्वात मोठी पत्रकारांची संघटना असलेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेश अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी यांचा मध्य प्रदेश येथे विविध धार्मिक संस्था व मंदिरात संस्थान तर्फे सत्कार करण्यात आला.. मध्यप्रदेश येथील प्रसिद्ध पुष्पगिरी तीर्थ येथे गणाचार्य परमपूज्य पुष्पदंतसागरजी महाराज यांनी आशीर्वाद रुपी नमोकार मंत्राची माळा प्रदान केली, क्रांतिकारी राष्ट्रसंत मुनीश्री आचार्य तरुणसागरजी



महाराज यांचे एक मात्र शिष्य परमपूज्य पर्वसागरजी महाराज यांनी माँ व क्रांतीसूत्र पुस्तकासोबत रक्षासूत्र , कलम देऊन आशीर्वाद रुपी सत्कार केला, सोबतच पुष्पगिरी तीर्थ संस्थांच्या वतीने अध्यक्ष प्रकाश अजमेरा यांनी त्यांच्या कार्यालयात भेटवस्तू सन्मान चिन्ह, पुस्तक देऊन सन्मानित केले. प्रसिद्ध तीर्थक्षेत्र माँ बगलामुखी मंदिरा मध्ये मुख्य पुजारी आचार्य महेश गुरुजी यांच्या हस्ते आशीर्वाद रुपी सत्कार करण्यात आला. बारा ज्योतिर्लिंग मध्ये एक असलेल्या ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात मुख्य पुजारी यांच्या हस्ते आशीर्वाद रुपी सोमाणी सत्कार करण्यात आला.. संत गुरु ,भगवंत व धार्मिक संस्थान ठिकाणी आशीर्वाद रुपी सत्कार होणे ही आपल्या जीवनाची खरी कमाई असल्याचे प्रतिपादन निलेश सोमानी यांनी केले. संतांच्या व भगवंतांच्या आशीर्वाद मुळे सामाजिक कार्याला बळ मिळाले अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. सोमाणी यांच्या समवेत समाजसेवी गणेश देगावकर, श्याम अपूर्वा, नारायण आरु, महादेव आगळे आदींची उपस्थिती होती.

# महाप्रसाद वाटप हे पुण्याचे काम-आ अक्षय कर्डीले,रवी शेठ कर्डिले मंडळाच्या यात्रेनिमित्त खिचडी वाटप





**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

बुऱ्हानगर येथील नवरात्र उत्सवात यात्रेनिमित्त आलेल्या भाविकांना रवी शेठ कर्डिले मंडळाच्या खिचडी वाटप आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले, त्याचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. यावेळी युवा नेते संदीप कर्डिले,सरपंच रावसाहेब कर्डिले,उपसरपंच जालिंदर जाधव ,रवी कर्डिले,सागर भगत,निलेश साळे, भाऊसाहेब कर्डिले, शांताराम कर्डिले,संतोष लवांडे,डॉक्टर राहुल भोसले, निलेश अवघडे,अमोल निमसे,अनिल कर्डिले, अविनाश तपकिरे, सुशील तपकिरे, अमोल धाडगे,सागर जाधव ,महेश दहिवाळ, देवा पालवे, किरण शिंदे, विनायक कर्डिले, ऋत्विक कर्डिले,दत्ता कर्डिले,दिनेश कर्डिले,अमोल कर्डिले व इतर असंख्य मित्र परिवार आदींसह मोठ्या संख्नेने मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रसादाचे पूजा करण्यात आले,नंतर स्व आ शिवाजी राव कर्डीले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यात्रेला मोठ्या संख्नेने भाविक आले होते.

आ.अक्षय कर्डीले यावेळी बोलताना म्हणाले महाप्रसाद वाटप हे पुण्याचे काम आहे ते सर्वांच्या भाग्यात नसते आज रवीशेठ व त्यांच्या मित्रांनी दरवर्षी प्रमाणे खन्ड न पडू देता खिचडी वाटप केले आहे, देवाच्या भक्तांना वाटले जाणारे पवित्र अन्न आहे, महाप्रसाद हा ईश्वरी कृपा मानून अत्यंत आदराने आणि पवित्रतेने ग्रहण केला जातो.यात जात, पात किंवा उच्च-नीच असा कोणताही भेदभाव नसतो, महाराष्ट्रातील मोठ्या संस्थानांमध्ये दररोज हजारो भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था असते. हा प्रसाद खाल्यावर मनाला प्रसन्नता मिळते मनुष्याच्या मुख्य गरजा तीन आहेत.अन्न, वस्त्र, निवारा.यापैकी श्रेष्ठ गरज आहे ती अन्नाची, तेव्हा सर्व दानात श्रेष्ठ दान कोणते तर ते अन्नदान असेहि ते म्हणाले.

संदीप कर्डीले म्हणाले भारतीय संस्कृतीमध्ये अन्नदानाचे फार महत्त्व आहे. जेवताना सुद्धा आपल्या संस्कृतीमध्ये मुक्याप्राण्यासाठी एक घास काढून ठेवण्याची पद्धत आहे. हे पण श्रेष्ठ दान आहे.आपल्या गावी आलेल्या भाविकांना अतिथी देवो भव म्हणून त्याला भोजन देणे हा श्रेष्ठ अन्नदानाचा प्रकार आहे.तो रवीशेठ कर्डीले व त्यांच्या मित्रमंडळीने राबविला आहे.

रवी कर्डीले म्हणाले गेले ४ वर्षे स्व शिवाजी राव कर्डीले यांच्या प्रेरणेने हा उपक्रम सुरु केला आहे,साहबांचे निधन झाल्याने यावर्षी करणार नव्हतो पण काल अक्षयदादांनी सांगितले साहेबानी सुरु केलीली प्रथेत खन्ड पडू देऊ नका म्हणून रात्रीतून सर्व तयारी करून दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत उपवासाची खिचडी वाटप केले,आज साहेबांची खूप आठवण येत आहे ,अन्नदान हे भगवंतांनी सांगितलेले श्रेष्ठ दान होय.कोणतीही अपेक्षा न ठेवता भक्तीने केलेले अन्नदान हे श्रेष्ठ दान होय.

# जुळणी न झालेले व तार्किक विसंगती असलेल्या मतदारांचे प्रलंबित कामकाज तातडीने पूर्ण करावे

## कामात हलगर्जीपणा करणाऱ्या बीएलओवर कारवाई करणार : सुनील गाढे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड तालुक्यातील जुळणी न झालेले ३,७८२ व तार्किक विसंगती असलेले ८,९६८ असे एकूण १२,७५० मतदारांपैकी फक्त २० टक्के म्हणजे २,५३७ मतदारांसंदर्भातच आतापर्यंत कार्यवाही झाली असल्याने प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी दिले आहेत. तहसील कार्यालय जामखेड येथे आयोजित करण्यात आलेल्या सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. वेळोवेळी सूचना देऊनही काही बीएलओ यांच्या कामात सुधारणा होत नसल्यामुळे कामात हलगर्जीपणा करणाऱ्या बीएलओवर कडक कारवाई करणार असल्याचेदेखील उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या बैठकीत बुधवार दि १४ ऑक्टोबर २०२६ कामकाजाचा आढावा घेताना काही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी अद्यापपावेतो कामच सुरू न केल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली असून, अशा कर्मचाऱ्यांना तातडीने नोटीस देऊन त्यांचा लेखी खुलासा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांनी मागविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले आहेत. यामध्ये विशेषतः जामखेड तालुक्यातील जांबवाडी, जामखेड यादी भाग क्रमांक १०४ व १०५, धामणगाव आणि माहारुळी या केंद्रांवरील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे कामकाज शून्य टक्के असून, वारंवार सूचना देऊनही सदर बीएलओ यांच्या कामात सुधारणा होत नसल्याची माहिती बैठकीत सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी दिली. याबाबत उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि काही बीएलओंना थेट बैठकीतूनच फोन लावून तातडीने काम सुरू करण्याचे कडक आदेश दिले.



दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यात जुळणी न झालेले व तार्किक विसंगती असलेले एकूण २,९२,४५२ मतदार असून, त्यापैकी ४७,६९२ मतदारांसंदर्भात कार्यवाही पूर्ण झालेली आहे. उर्वरित मतदारांसंदर्भात आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून घेऊन त्याबाबत उचित कार्यवाही करण्याचे काम जिल्ह्यातील सुमारे ३८२ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत सुरू असल्याचे श्री. सुनील गाढे यांनी सांगितले असून, त्या अनुषंगानेच जामखेड तालुक्यातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. तसेच भारत निवडणूक आयोगाने दावे व हरकती दाखल करण्यासाठी २६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली असल्याने नवोदित मतदारांची जास्तीत जास्त नोंदणी करून घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. प्राप्त होणाऱ्या फॉर्मबाबत म्हणजेच नावनोंदणी, वगळणी व दुरुस्ती इत्यादी बाबींवर विहित मुदतीत व विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून निर्णय घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. या महत्त्वाच्या बैठकीस उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांच्यासमवेत प्रभारी तहसीलदार शीतलकुमार सावळे, गटविकास अधिकारी शुभम जाधव, निवडणूक नायब तहसीलदार विशाल सदनापूर, प्रदीप पांडुळे, प्रियांश सरोदे, संगणक चालक अभिजित रायकवाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

# नागरिकांनी खचून जाऊ नये, शासन आपल्या पाठीशी खंबीर : आमदार काशिनाथ दाते सर

## राज्यातील दुष्काळग्रस्तांना विविध सवलती व उपाययोजना

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

**बुधवार दि. १४ आक्टो. २०२६ खरीप हंगाम २०२६ मधील प्रतिकूल परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या दुष्काळाच्या संकटात नागरिकांनी खचून जाऊ नये, शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असून दुष्काळग्रस्तांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना व सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत, असा विश्वास आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३०५ तालुके अंतिमतः दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करून विविध सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला असून, या निर्णयाची माहिती पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने आमदार दाते सर यांनी शासन निर्णयातील महत्त्वपूर्ण तरतुदी स्पष्ट केल्या.**

महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन विशेष बाब म्हणून विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे प्रतिकूल परिस्थितीचा सामना करणाऱ्या ग्रामीण जनतेला दिलासा मिळण्याची अपेक्षा असून, संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे महत्त्वाचे असल्याचेही आमदार दाते सर यांनी सांगितले.

या शासन निर्णयानुसार दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जांच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या चालू वीजबिलात नियमानुसार सवलत तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी अशा महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. रोजगार हमी योजनेअंतर्गत अधिकाधिक कामे सुरू करण्यासाठी निकषांत शिथिलता देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि विद्यार्थ्यांना आवश्यक दिलासा मिळणार आहे.

दुष्काळाच्या काळात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषिपंपांची वीजजोडणी खंडित न करणे, शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये यासाठी व्यवस्था करणे आणि पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे अशा उपाययोजनांचाही समावेश आहे. याशिवाय जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यावर शासनाने भर दिला आहे.

पीक नुकसानीबाबत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीसंदर्भातही शासन निर्णयात महत्त्वाची तरतूद करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त घोषित केलेल्या तालुक्यांतील शेतकऱ्यांना पीक नुकसानीची मदत विहित कार्यपद्धती पूर्ण केल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी संबंधित विभागांकडून मिळणाऱ्या अधिकृत सूचना आणि पुढील प्रशासकीय कार्यवाहीकडे लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले असल्याचे आमदार दाते सर यांनी सांगितले.

पुढे बोलताना आमदार दाते सर यांनी दुष्काळ ही केवळ शेतीची समस्या नसून त्याचे परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्था, पशुपालन, रोजगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही होत असतात. अशा परिस्थितीत शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजनांची माहिती प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचणे आणि त्यांना नियमानुसार लाभ मिळणे आवश्यक असल्यानेच शासन निर्णयातील तरतुदी नागरिकांसमोर मांडत संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही तत्परतेने करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.



**दुष्काळाच्या संकटात नागरिकांनी निराश होऊ नये. शासनाने जाहीर केलेल्या सवलती व उपाययोजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. शेतकरी, शेतमजूर, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे,**

**– आमदार काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

# सोळाव वरीस धोक्याच नसून मोक्याच असत : डॉ.स्वप्निल चौधरी

## सर्वोदय विद्यालयात कला व वाडमय मंडळाचा उद्घाटन सोहळा संपन्न





राजूर (समर्थ गांवकरी)

झोपेत पडतात ती स्वप्न नाहीत, तर झोप मोडतात ती स्वप्न असतात. म्हणूनच स्वप्न व ध्येयांवर लक्ष केंद्रीत करा. वयानुसार निर्णय घ्या. कारण सोळाव वरीस धोक्याच नसून मोक्याच असत. असे विचार सुप्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी यांनी व्यक्त केले.

गुरुवर्य रा.वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उच्च-माध्यमिक विभागाचा कला मंडळ व वाडमय मंडळाचा उदघाटन सोहळा लोकप्रिय कवी डॉ.स्वप्निल चौधरी यांचे शुभहस्ते पार पडला. याप्रसंगी डॉ. चौधरी विचारमंच्यावरून बोलत होते.

यावेळी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. अत्यंत साध्या व ओघवत्या शैलीमध्ये डॉ. स्वप्निल चौधरी यांनी अनेक प्रसंग विनोदी शैलीमध्ये सांगत उपस्थितांना अक्षरशः पोट धरून हसविले. 'दंगल समजून घेऊ', 'बायको', 'कर्जबारपणाची जिंदगी', 'निसर्ग' यासारख्या आपल्या कविता सादर करताना त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

आपल्या आयुष्यातील अनेक घटना व अनुभव सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनाचा खरा अर्थ उलगडून सांगितला. कला व वाडमय या दोन्ही गोष्टींनी आपले व्यक्तिमत्व कसे घडते हे त्यांनी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. बदलत्या सामाजिक परिस्थितीमध्ये मुला-मुलींनी आपला आत्मविश्वास कसा वाढविला पहिले याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. ज्याच्या हातामध्ये पुस्तक, तो कुणापुढेही होत नाही नतमस्तक असे सांगताना त्यांनी जीवनात शिक्षणाचे महत्व विषद केले. लढाऊपणाचा अंगीकार, टीकेकडे दुर्लक्ष व दुसऱ्यांशी तुलना टाळणे हीच यशस्वी जीवनाची खरी त्रिसूत्री असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब बनकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. 'कलेची उपासना करताना समर्पित वृत्ती हवी, संघर्षाविना कोणतेही यश मिळत नाही. ज्ञान मिळवा, संघर्ष करा व स्वतःला सिद्ध करा हाच जीवनाचा मूलमंत्र आहे', असे प्रतिपादन प्राचार्यांनी बनकर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये केले.

उपप्राचार्य दिपक बु-हाडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ज्येष्ठ शिक्षक व कार्यक्रमाचे संयोजक शरद तुपविहिरे यांनी पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला. कला मंडळ प्रमुख बाळासाहेब घिगे यांनी आभार मानले. संतराम बारवकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक संजय व्यवहारे, माजी प्राचार्य लहानू परबत यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उच्च-माध्यमिक विभागातील सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अथक परिश्रमामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी उद्योजकीय मानसिकता विकसित करावी; दर्शन मेहेर यांचे आवाहन

## एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज अंतर्गत २०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज' उपक्रमांतर्गत 'कल्पनेपासून परिणामापर्यंत : अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये उद्योजकीय मानसिकतेची जडणघडण' या विषयावर विशेष व्याख्यान संपन्न झाले.

या व्याख्यानात ऑडियाबेटिक बॅटरीज प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी दर्शन मेहेर यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकता, स्टार्टअपची उभारणी आणि निधी संकलन याविषयी मार्गदर्शन केले.

७ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमात मेहेर यांनी स्वतःच्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. एखाद्या नावीन्यपूर्ण कल्पनेचे यशस्वी व्यवसायात रूपांतर करताना येणारी आव्हाने, त्यावर मात करण्याचे मार्ग आणि व्यवसायाच्या वाढीसाठी आवश्यक असणारे नियोजन याविषयी त्यांनी माहिती दिली. स्टार्टअप उभारण्यासाठी केवळ कल्पना असून चालत नाही, तर तिची व्यवहार्यता तपासणे, योग्य व्यवसाय योजना तयार करणे आणि उपलब्ध संधींचा प्रभावीपणे उपयोग करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचणे, त्यांच्यासमोर व्यवसायाची संकल्पना प्रभावीपणे मांडणे आणि त्यांचा विश्वास संपादन करून निधी उभारणे या प्रक्रियेतील महत्त्वाचे पैलू त्यांनी उलगडून सांगितले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. नवथर, विविध विभागांचे विभागप्रमुख आणि प्राध्यापक उपस्थित होते. महाविद्यालयाच्या नऊ अभियांत्रिकी शाखांमधील सुमारे २०० विद्यार्थी आणि १० प्राध्यापकांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. प्राचार्य डॉ. नवथर यांनी प्रास्ताविकात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचार, उद्योजकीय दृष्टिकोन आणि स्टार्टअप संस्कृती विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी वक्त्यांशी संवाद साधत स्टार्टअप उभारणी, निधी संकलन आणि उद्योजकीय क्षेत्रातील संधींबाबत विविध प्रश्न विचारले. दर्शन मेहेर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दत्तात्रय ननवरे यांनी केले, तर प्रा. एम. ए. तांबोळी यांनी कार्यक्रम समन्वयक म्हणून काम पाहिले. या उपक्रमाच्या आयोजनाबद्दल प्राचार्य डॉ. नवथर यांनी संबंधित विभागप्रमुखांचे कौतुक केले.

या उपक्रमासाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच फाउंडेशनचे महासंचालक डॉ. पी. एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

# अकोलेत गोवंशाच्या अवैध वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

## तिघांविरुद्ध गुन्हा दाखल!

- चार गोवंश जनावरे आणि पिकअप वाहन जप्त; ४ लाख ४० हजारांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात!









अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील शिदवड फाटा परिसरात गोवंश जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याप्रकरणी अकोले पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी गुफरान अजीज सय्यद, अन्वर अजीज सय्यद आणि मुस्ताकिम कुरेशी या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी चार गोवंश जनावरे आणि महिंद्रा मॅक्स पिकअप वाहन असा एकूण ४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी शिदवड फाटा परिसरात ही कारवाई करण्यात आली. यावेळी संबंधित पिकअप वाहन ताब्यात घेऊन त्यामधील चार गोवंश जनावरे जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या जनावरांची किंमत ४० हजार रुपये, तर महिंद्रा मॅक्स पिकअप वाहनाची किंमत ४ लाख रुपये असल्याचे कागदपत्रांत नमूद आहे.

या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५९३/२०२६ अन्वये पोलीस कॉन्स्टेबल योगेश जोरगील यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलीस कॉन्स्टेबल विजय फटांगरे, महेंद्र गुंजाळ आणि मंगेश बिडवे यांनी सहभाग घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिल जाधव करीत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची तिसरी यादी जाहिर

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

- जिल्ह्यातील ४ हजार ४१५ शेतकऱ्यांचा समावेश
- जिल्हा बँकेच्या ०१ हजार ४७१ शेतकऱ्यांचा समावेश
- इतर बँकेचे २ हजार ९४४ शेतकरी
- आधारी प्रमाणीकरण करून घेण्याचे आवाहन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेअंतर्गत लाभ मिळालेल्या शेतकऱ्याची तिसरी यादी प्रसिध्द झाली असून या यादीमध्ये जिल्ह्यातील ४ हजार ४१५ शेतकऱ्यांचा समावेश आहे. पहिल्या दोन यादी मध्ये १ लाख ४२ हजार ४४१ शेतकऱ्यांचा समावेश असून आजपर्यंत एकूण १ लाख ४६ हजार ८५६ शेतकऱ्यांची आधार प्रमाणीकरणाची यादी उपलब्ध झाली असून १ लाख ३३ हजार ५०५ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केल्याचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी सांगितले आहे.

राज्यातील शेतकरी हा राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे काही वेळेस पिकांचे नुकसान होते. त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकत नाही. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकाकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यानुसार जिल्ह्यातील आजपर्यंत एकूण १ लाख १५ हजार २१५ शेतकऱ्यांच्या खात्यावर १ हजार ११४ कोटी रुपये जमा झालेले आहेत. ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांवरही लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांनीही आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढावा तसेच जे मयत खातेदार आहेत अशा खात्यांच्या बाबतीत त्यांच्या वारसाने विकास संस्थेकडे, बँकेकडे वारसाची नोंद लावून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

# मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये शारदीय नवरात्रोत्सव अनोखा उपक्रम

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

- जीवन कौशल्यावर आधारित मूल्य शिक्षणाचा उपक्रमात विद्यार्थ्यांचा उस्फूर्त सहभाग
- विद्यार्थ्यांनी शिकले भाजी निवडणे,भांडी घासणे ते भाजी-पोळी बनवणे

शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हिंद सेवा मंडळ संचलित मेहेर इंग्लिश स्कूल,अहिल्यानगर येथे विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्यावर आधारित अनोख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कामांवर आधारित होते. वर्गानुसार उपक्रमांची विभागणी करण्यात आली होती. या उपक्रमांसाठी शाळेचे चेअरमन श्री. जगदीशजी झालानी व मुख्याध्यापिका अनुरिता झगडे यांचे विशेष मार्गदर्शन व सर्व सहशिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

उपक्रमांचा तपशील पुढीलप्रमाणे -इ. १ ली व २ री प्रत्येक विद्यार्थ्याला घरून मेथीच्या भाजीच्या १०-१२ काड्या व मोठी कटोरी आणण्यास सांगितले होते. विद्यार्थ्यांनी आनंदाने भाजी निवडण्याचे प्रशिक्षण घेतले.

इ.३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी शर्ट,बटण, सुई-धागा आणून प्रत्यक्ष शर्टाला बटणे लावण्याचा सराव केला.

इ. ५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी घरून ताट,वाटी, छोटी प्लेट, ग्लास, तांब्या, साबण व घासणी आणली व आपापली भांडी स्वच्छ घासून, धुवून दाखविली.

इ.७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांना भाजी-पोळी बनवण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले.यासाठी पीठ, मीठ, पोळपाट, लाटणे, तेल, मूगडाळ, कांदा, टोमॅटो व इतर साहित्य विद्यार्थ्यांनी घरून आणले होते.

यासाठी मुलांचा व मुलींचा असे दोन गट करण्यात आले होते. मुलांनी मूगडाळीची भाजी तयार केली.तर मुलींनी पोळ्या लाटल्या. हा सर्व स्वयंपाक शाळेच्या आवारात चूल मांडून मुख्याध्यापिका अनुरिता झगडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला.

यावेळी चेअरमन जगदीश झालानी म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगात फक्त पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. मुलांना स्वावलंबी बनवणे,हीच खरी शिक्षणाची कसोटी आहे.स्वतःची भांडी घासणे,भाजी निवडणे किंवा स्वतःचा स्वयंपाक करणे,ही कामे लहान वाटत असली तरी यातून मुलांमध्ये आत्मविश्वास,श्रमाची प्रतिष्ठा आणि व्यवस्थापन कौशल्य विकसित होते.



अहिल्यानगर - मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये इ. १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांनी भाजी निवडण्याचे प्रशिक्षण घेतले.



प्राचार्य अनुरीता झगडे म्हणाले,शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त शाळेतील माता पालकांसाठी साबुदाणा विरहित उपवासाचे पदार्थ बनविण्याची स्पर्धा तसेच शाळेतील शिक्षकांसाठी व्यक्तिमत्व विकासाच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भाजी-पोळीचा सर्वांनी आस्वाद घेतला.

# चारा टंचाईवर मात करण्यासाठी अहिल्यानगर ग्रामीण तालुक्यात नियोजन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

- अहिल्यानगर तालुक्यातील सर्व गावांमध्ये २१ ऑक्टोबर रोजी ग्रासभांचे आयोजन
- VBG-RMG योजनेंतर्गत चारा लागवडीसाठी इच्छुक शेतकऱ्यांनी ग्रामसभांना उपस्थित राहण्याचे तालुका प्रशासनाचे आवाहन

आगामी काळात चारा टंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन अहिल्यानगर (ग्रामीण) तालुक्यात चारा लागवडीचे नियोजन करण्यात येत आहे. यासाठी विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) VBG-RAMG योजनेंतर्गत चारा लागवडीची कामे हाती घेण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचा निर्णय तालुका प्रशासनाने घेतला आहे. या अनुषंगाने २१ ऑक्टोबर रोजी तालुक्यातील सर्व गावांमध्ये ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार असून, या ग्रामसभांना चारा लागवडीसाठी इच्छुक वैयक्तिक शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

चारा टंचाईच्या संभाव्य परिस्थितीचा विचार करून त्यावर वेळीच उपाययोजना करण्यासाठी १२ऑक्टोबर रोजी तहसीलदार, अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला तालुका कृषी अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी, सहाय्यक गट विकास अधिकारी तसेच सर्व मंडळाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत आगामी काळातील चारा टंचाईची शक्यता लक्षात घेऊन चारा लागवडीसाठी आवश्यक नियोजन करण्यावर भर देण्यात आला.






विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) (VBG-RMG) योजनेंतर्गत चारा लागवडीची कामे करण्यास इच्छुक असलेल्या वैयक्तिक शेतकऱ्यांना या योजनेची माहिती मिळावी, तसेच त्यांना चारा लागवडीच्या कामांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने गावपातळीवर जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार, २१ ऑक्टोबर रोजी तालुक्यातील सर्व गावांमध्ये ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार आहे. या ग्रामसभांच्या माध्यमातून VBG-RAMG योजनेंतर्गत चारा लागवडीच्या कामांची माहिती देण्यात येणार असून, या उपक्रमाबाबत व्यापक प्रसिद्धी करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.